भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. केडगाव

| मुदत ठेव | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवसाकरिता | ८ % |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ९ % |
| ९१ दिवस ते ३६५ दिवस | १० % |
| १२ महिने ते १७ महिने | १०.५० % |
| १८ महिन्याच्या पुढे | ११ % |
| मासिक ठेव (संचित मुदत ठेव) | ८% |
| दैनंदिन ठेव (बिंदुसागर ठेव) | २.५०% |
| व्यक्तीगत सेव्हिंग्ज ठेव (द.सा.द.शे) | ५% |

आपल्या विश्वासाची भैरवनाथ पतसंस्था केडगाव, नगरकरांच्या सेवेत घेऊन येत आहे
सुवर्ण कर्ज व ठेव योजना
सर्व ठेवी ज्येष्ठ नागरिक ०.५०% (अर्धा टक्का व्याज) जादा



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. ०२.१२.२०२४ | अंक नं. २२९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# हेल्मेट सक्ती कायद्यामधून नगरला वगळावे अन्यथा 'सविनय कायदेभंग' करावा लागेल

नगर – दुचाकीवर मागे बसणाऱ्या व्यक्तीला देखील हेल्मेट सक्ती करण्यात आलेली आहे, कुठलाही मागचा पुढचा विचार न करता असा तुघलकी कारभार कसा काय केला जातो? याचे उदाहरण प्रशासनाकडून घालून दिले जात आहे, प्रशासनाची जबाबदारी म्हणून नागरीकांना अतिशय सुरक्षित अतिक्रमण मुक्त रस्ते, रस्त्यातले आडवे लाईटचे खांब, फुटपाथवरची घाण, हातगाड्या हे सर्व दूर करून चोख वाहतूक व्यवस्था देऊ असे निर्णय घेण्याऐवजी वर्षानुवर्षे आणि पिढ्यान्‌पिढ्या नगरसारख्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या जिल्ह्याच्या ठिकाणी, अतिक्रमण कधीच काढले जात नाहीत, सहा महिने टिकतील असे रस्ते देखील तयार केले जात नाहीत, ट्रॅफिक सिग्नल चालू केले जात नाहीत. विजेच्या लोंबकळणाऱ्या तारा काढल्या जात नाहीत, रिक्षाला मीटर फक्त गंमत म्हणून लावलेले असते की काय असा प्रश्न नगरमध्ये पडलेला आहे.

६ सीटर नाव असलेल्या वाहनामध्ये १६ माणसं कोंबड्यांसारखे भरली जातात सगळे वाहतुकीच्या बाबत उदासीनतेचे असे अनेक अनाकलनीय प्रश्न पिढ्यान पिढ्या प्रलंबित असलेल्या या शहरात मग हेल्मेट सक्ती कशासाठी? आणि मुख्य म्हणजे हे बिनडोक प्रशासन असा विचार का नाही करत? की हेल्मेट सक्ती जरूर असावी परंतु ती फक्त हायवेवर असावी, शहराच्या अंतर्गत रस्त्यावर नाही. कारण शहराच्या अंतर्गत अरुंद आणि अतिक्रमण युक्त रस्त्यावर वीस किलोमीटर प्रति घंटा या वेगापेक्षा जास्त वेगाने साक्षात ब्रह्मदेवाला देखील शहरातून गाडी चालवता येणार नाही. त्याच्यासाठी हेल्मेट कशाला? मग हेल्मेट सक्ती करून फक्त दंड वसुलीचा कारभार केला जाणार आहे का?



व्यंगचित्र सुहासभाई मुळे..9002668555

नगर सारख्या शहराची लोकसंख्या जेव्हा पुर्वी दीड लाख होती, तेव्हा ट्रॅफिक पोलीस ८५ होते, आणि आज लोकसंख्या पाच लाख झाली आणि ट्रॅफिक पोलीस अवघे २५ उपलब्ध आहेत, त्यामुळे कुठल्या चौकात त्यांचे दर्शन सुध्दा दुर्मिळ झालेले आहे. आणि वर्षानुवर्ष बंद असलेले, कुणीही त्याचे नियम पाळत नसलेले ट्रॅफिकचे सिग्नल तर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात ठेवायच्या लायकीचे झालेले आहेत.

आधीच अरुंद असलेल्या रस्त्यांवर अतिक्रमणं तर आता एवढे झाले आहेत की फक्त सर्कसमध्ये काम करणारा माणूसच अहमदनगर शहरांमध्ये दुचाकी घेऊन रस्त्यावर चालू शकतो या सर्व पार्श्वभूमीवर अहमदनगर शहराला हेल्मेट सक्ती मधून वगळण्यात यावे. कसलेही वाहतुकीचे नियोजन न करता एकाच वेळी तयार करायला हातात घेतलेले रस्ते, तिथे उडत असलेला प्रचंड धुराळा, कोंडी. या पार्श्वभूमीवर जर नगर शहरात नागरिकांनी जर खरच हेल्मेट घातले तर करोनामुळे जे मेले नाहीत, ते सुध्दा निश्चितच गुदमरून मरून पडतील, यात शंकाच नाही. *(पुढील मजकूर पान २ वर)*


तुम्ही ॲलर्जीने त्रस्त आहात का?
वारंवार होणारी सर्दी, खोकला व दमा विकार
शरीरावर लाल चट्टे येऊन अंग सुजणे व खाज येणे.
ॲलर्जी कमी करण्यासाठी औषधे घ्यावी लागणे.
नेहमी डोळ्यांना खाज सुटणे व डोळे लाल होणे.
कोणत्याही वयातील रुग्णांसाठी वरील व्याधींवर आता खात्रीशीर निदान व उपचारासाठी नगर जिल्ह्यातील एकमेव परिपूर्ण असे "अहमदनगर ॲलर्जी टेस्टींग सेंटर"
डॉ. कृष्णा बलदवा
(एम.बी.बी.एस.) ॲलर्जी-त्वचारोग, दमा व मधुमेह तज्ञ
-:नवीन पत्ता:-
जुने वाळिंबे हॉस्पिटल, वर्धमान टायर समोर, बांबु गल्ली, घरती चौक, अ.नगर
Mo. 8390907414 / 9422227414
सोमवार ते शनिवार * वेळ : स. १० ते २:३० सायं. ६ ते ९. पर्यंत
रविवार * वेळ : स. १० ते दु. १ पर्यंत


# शहरातील 'फ्लेक्स बोर्ड, बॅनर, होर्डिंग'बाबत जिल्हाधिकारी व आयुक्तांना अवमान नोटीस

## २४ तासात कारवाई न केल्यास अवमान याचिका दाखल करण्याचा ॲडव्होकेट दिनेश वाघमारे यांचा इशारा

नगर – शहरात ठिकठिकाणी न्यायालयाचे आदेश डावलून अनधिकृत फ्लेक्स बोर्ड, बॅनर, होर्डिंग सर्वत्र लावण्यात आलेले आहेत. सदरचे बेकायदेशिर फलक काढण्याचे अधिकार हे जिल्हा दंडाधिकारी म्हणून जिल्हाधिकारी व महानगर दंडाधिकारी म्हणून महानगरपालिका आयुक्त यांना संविधानाने दिलेले आहेत. सदर बेकायदा फलकावर अद्यापही कारवाई केलेली दिसून येत नाही. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेश व निर्देशांचे उल्लंघन व अवमान होत आहे. तरी सदर नोटीस प्राप्त होताच आपण तत्काळ २४ तासांच्या आत अहिल्यानगर शहरातील सर्व अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकावेत अन्यथा आपल्याविरुद्ध 'कंटेम्प्ट ऑफ कोर्ट' याचिका दाखल करावी लागेल, असा अशारा ॲड.दिनेश चंद्रकांत वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांना अवमान नोटीसीद्वारे दिला आहे.

यासंदर्भात ॲड.वाघमारे यांनी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना जारी केलेल्या नोटीसीत म्हटले आहे की, जिल्हा दंडाधिकारी म्हणून आपणास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उच्च न्यायलयाने आपणास काही आदेश दिले आहेत. आपल्या अधिपत्याखाली महानगरपालिका आयुक्त कार्यरत आहेत. उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ अन्वये १८/११/२०२४ रोजीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र सार्वत्र निवडणूक २०२४ च्या निकालानंतर नगर परिषद महापालिका क्षेत्रात बेकायदा अनाधिकृत जाहिरात पोर्स्टस, बॅनर्स, होर्डिंग्स लावून शहराचे विद्रुपीकरण करण्यात येईल, अशा बेकायदा अनाधिकृत जाहिराती, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग उभारण्यास पुर्णपणे मनाई केलेली आहे. परंतु विधानसभेचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहिर झाल्यानंतर दैनिक नवा मराठाच्या २८ नोव्हेंबरच्या अंकात न्यायालयाचे आदेश डावलून राजकीय बॅनरबाजी जोरात अशी बातमी छापून आलेली आहे. त्यानुसार बेकायदेशिर फलकाविरोधात आपण कोणतीही कारवाई केलेली नसून ते न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन ठरत आहे. याबाबत योग्य ती कारवाई करावी अन्यथा आपल्या विरोधात अवमान याचिका दाखल करण्यात येईल, असे नोटीसीत ॲड.वाघमारे यांनी नमुद केले आहे.


स्मृतीगंध

स्व. रमेशजी नेमीचंदजी मुनोत
स्व. दि. ३/१२/२००७
स्व. चित्रा रमेशजी मुनोत
स्व. दि. ३/१२/२००७
कदम कदम पर आयेंगी याद,
आपकी प्रेरणा आपकी हर बात.
सफर हो कितना भी मुश्किल
आपका आशीर्वाद रहेंगा हमारे साथ...!
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली...!
* दुःखांकित *
मुनोत परिवार
फर्म : मुनोत ग्रुप ऑफ कंपनीज्, अ.नगर

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
मोफत सर्व रोग तपासणी शिबीर
दि. २५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
* मोफत ॲन्जीओप्लास्टी
* माफत डायलेसीस/किडनी विकार
* माफत कर्करोग शस्त्रक्रिया
* मोफत नवजात अतिदक्षता विभाग
* मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनेग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
* शिबीरस्थळ *
इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001
टिप : नाव नोंदणी आवश्यक
मोफत ओ.पी.डी.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात | दिनांक : 28 नोव्हेंबर ते 05 डिसेंबर 2024
SINGHAM AGAIN 09:00 AM I 02:00 PM 04:45 PM I 10:00 PM
THE SABARMATI REPORT 11:40PM I 07:30 PM
BHOOL BHULAIYAA 3 09:45 AM I 04:00 PM 10:20 PM
KAL HO NAA HO 10:15 PM
CHHATRAPATI SAMBHAJI MAHARAJ 09:00 AM I 12:45 PM 04:45 PM I 07:00 PM
MOANA 2 (3D) HIN-12:15 PM I 08:00 PM ENG-02:30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
Available on bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

Career Ki Shuruwat DiSHA ke saath
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
Accounting & Taxation च्या क्षेत्रात विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती हेच आमचे ध्येय
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Duration : 6 Months
Experienced Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## मन – जग – बाजारपेठ




आपले मन हेच आपल्या स्वातंत्र्याचे, पारतंत्र्याचे कारण बनले आहे. सुख आणि दुःख, शक्ती व दुर्बलता हे सर्व काही मनाच्या अवस्थेवरच अवलंबून असते.


वेदांनुसार मन हे भौतिक शरीर अन् आध्यात्मिक स्व या दोहोंपासून भिन्न आहे. आध्यात्मिक स्व हा जाणकार आहे आणि मन हे जाणकार होऊन ज्ञान ग्रहण करण्याचा विषय आहे.

मन हा अतिसूक्ष्म पदार्थ आहे. माईंड ॲण्ड मॅटर यामध्ये फरक करणाऱ्या पाश्चात्त्य दृष्टिकोनापेक्षा हा वेगळा दृष्टिकोन आहे. वेदांतानुसार मन हे आंतरिक उपकरण आहे. त्यावर नियंत्रण मिळवणे हीच मनुष्याच्या विकासाची खरी कसोटी आहे.

आपण सोडून संपूर्ण जग आनंदी आहे असे वाटणे हे मनुष्याच्या मनाचे आणखी एक वैशिष्ट्य! मन आधी भौतिकतेच्या पूर्ततेचा प्रयत्न करते परंतु जेव्हा त्या सुविधा मिळत नाही तेव्हा ते विरागी होते.

मनाच्या सर्व प्रक्रिया सामूहिकतेमध्येच सकारात्मक असतात. एकटेपणा मनाला टोचत राहतो. घाबरवून सोडतो. त्यात आपला मेंदू, कुटुंब, एकूण समाजच आभासी बाजाराच्या स्वाधीन झालाय.

जगात वावरतांना स्वतःच्या आत्मानंदाऐवजी दुसरा काय म्हणेल, बाजारपेठ कशी हे पाहिलं जातं. बाजारू अस्त्रांमुळे लढाईत हरणारा तर हरेलच पण जिंकणाराही हरेल! – योगेश मिश्र



### दैनिक नवा मराठाचे ज्येष्ठ पत्रकार

## सुभाष भांगे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – आर्यन गार्डन बिल्डींग बालिकाश्रम रोड येथील रहिवाशी व दैनिक नवा मराठाच्या संपादक विभागातील ज्येष्ठ पत्रकार सुभाष सदाशिव भांगे (वय ६९) यांचे १ डिसेंबर रोजी दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, भावजयी, दोन बहिणी, भाचे, पुतणे असा परिवार आहे.

दै.नवा मराठाच्या संपादकीय विभागात ते १९८४ पासून काम पाहत होते. अहमदनगर प्रेस क्लबचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.


## गोरख काळे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – बाबुर्डी घुमट येथील रहिवाशी गोरख लाभाजी काळे (वय ६२) यांचे २ डिसेंबर रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. सोमवारी सकाळी बसलेले असतानाच त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. तातडीने त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

त्यांच्यावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

## मोतीलाल चांडक यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – गुलमोहर रोड, सावेडी येथील रहिवाशी मोतीलाल रामधन चांडक यांचे १ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीराम, श्रीकांत चांडक यांचे ते वडील होत तर चंद्रकांत, रविंद्र, गोपाळ काबरा यांचे ते काका होत.

## विजय बल्लाळ यांचे वृद्धापकाळामुळे निधन



नगर – सावेडी उपनगरातील शिलाविहार वसंत टेकडी येथील विजय गंगाधर बल्लाळ (वय ७८) यांचे २८ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळामुळे राहत्या घरी निधन झाले. त्यांनी ३४ वर्ष युनियन बँक ऑफ इंडियामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात आदी राज्यातील शाखेमध्ये सुरवातीला कॅशियर नंतर व्यवस्थापक म्हणून सेवा बजावली. त्यांच्यामागे २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## शांताबाई धुमाळ यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सिव्हिल हडको येथील रहिवासी श्रीमती शांताबाई लालाजी धुमाळ (वय ७२) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्या अत्यंत धार्मिक व मनमिळावु स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात २ मुली, एक मुलगा, नातू, पणतू असा परिवार आहे. राजेश धुमाळ यांच्या त्या मातोश्री होत.

## ताराबाई मगर यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील ताराबाई पांडुरंग मगर (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, दिर, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. श्री स्वामी समर्थ इंजिनिअरिंग वर्क्सचे मालक गणेश मगर व महेश मगर यांच्या मातोश्री होत.

## अंजनाबाई पगार यांचे वृद्धापकाळाने निधन




श्रीरामपूर – येथील अंजनाबाई दत्तात्रय पगार (वय ८१) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. एस.एस.जी.एम. कॉलेज, कोपरगावचे प्राध्यापक ज्ञानदेव पगार (सर) यांच्या मातोश्री होत.

## राजसबाई जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील राजसबाई मिठाराम जाधव (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. निलेश टेन्ट हाऊसचे मालक दामोधर जाधव यांच्या मातोश्री, निलेश जाधव यांच्या आजी होत.

# पाचशे रुपयांच्या चलनी नोटांवर महात्मा फुले यांची प्रतिमा छापावी



नगर – हजारो वर्षे भारतावर लादल्या गेलेल्या स्त्रीदास्य व जातीदास्य संपविणारे महात्मा फुले यांची प्रतिमा भारतातील चलनी पाचशे रुपयांच्या नोटांवर छापण्याची मागणी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन संघटनेच्या वतीने राष्ट्रपती, पंतप्रधान, अर्थमंत्री आणि रिझर्व बँकेचे गव्हर्नर यांच्याकडे ईमेलद्वारे पाठविण्यात आली असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

उन्नत चेतनेच्या अभावामुळे आणि आर्थिक व सामाजिक स्वार्थापोटी म्हणून मनुने कायदे केले. त्यातून भारतीय उपखंडात हजारो वर्षे जातीदास्य आणि स्त्रीदास्य लादले गेले. त्यातून समाजातील ७०–८३ टक्के लोक सामाजिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या दिव्यांग राहिले. भारत शेकडो वर्षे परकीयांच्या गुलामगिरीत खितपत पडला. इंग्रजांनी लादलेली गुलामगिरी सुद्धा भारतातील टोकाचे आर्थिक दारिद्र्य आणि सामाजिक विषमता यामुळेच दीडशे वर्ष टिकून राहिली. महात्मा फुले यांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने भारतात स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू केली. त्यातून आजपर्यंत स्त्री शिक्षणामध्ये क्रांती झालेली आहे. मोठ्या प्रमाणात महिला स्त्रीदास्यातून बाहेर पडल्या. त्याच वेळेला जाती दास्यातून निर्माण झालेल्या गुलामगिरीवर सुद्धा महात्मा फुलेंनी आसूड ओढले आणि या देशातील दुबळा समाज जागृत झाला. पुढे जाऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून स्त्रीदास्य आणि जातीदास्य संपूर्ण हद्दपार केले. यामुळे मनुचा सामाजिक आणि आर्थिक दिव्यांग करणारा कायदा मोडीत निघाला असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अफलातून कामगिरी करणाऱ्या महात्मा गांधीजींची प्रतिमा भारतीय चलनावर छापली जाते. परंतु त्याच वेळेला भारतीय उपखंडातील स्त्रीदास्य व जातीदास्य संपविण्यासाठी क्रांती करणाऱ्या महात्मा फुलेंची देखील प्रतिमा चलनी पाचशे रुपयांच्या नोटांवर छापली जावी, अशी संघटनेने आग्रही मागणी केलेली आहे.

समाजासाठी संपूर्ण आयुष्य खर्च केलेल्या महात्मा ज्योतिराव फुले यांना कृतज्ञ भावनेने आदरांजली वाहण्यासाठी सरकारने त्यांची प्रतिमा चलनी नोटांवर छापण्याचे निवेदनात म्हंटले आहे. भारतीय संविधान उन्नत चेतनेची गंगोत्री आहे. त्यातून भारतीय स्त्रीदास्य आणि जातीदास्य पूर्णपणे नक्कीच संपू शकेल. परंतु त्याच वेळेला जाती–मंडूक आणि धर्मवेडे लोकशाहीमध्ये बहुमताच्या जोरावर चुकीची सत्ता आणू पाहत आहेत. त्यातून पुन्हा भारत हा सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या दिव्यांग होण्याची शक्यता असल्याचा धोका संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. याच कारणासाठी भारतात लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व वकीलांच्या संघटना प्रयत्नशील असल्याचे म्हंटले आहे.

# अभिषेक फिरोदिया एमएस परीक्षा उत्तीर्ण



नगर – येथील अभिषेक फिरोदिया हा मास्टर्स इन कॉम्प्युटर सायन्स (Master in Computer Scince) North Carolina State University, USA येथून २०२४ मध्ये उत्तीर्ण झाला.

अभिषेक हा डॉ.संदीप अमोलकचंद फिरोदिया व डॉ.सौ.नुतन संदीप फिरोदिया यांचे चिरंजीव तसेच ॲडव्होकेट व नोटरी पब्लिक जी.बी.गांधी व सौ.अरुणा गांधी यांचा नातू आहे. तो सध्या Manager in IT Department of NCSU (in USA) येथे कार्यरत आहे.

# नगरमध्ये ८ डिसेंबरला बौद्ध वधू-वर मेळावा

नगर – शहरामधील देवागं कोष्टी समाज सेवा मंडळ हॉल, सावेडी बसस्टँड शेजारी, नगर मनमाड रोड, अहिल्यानगर येथे ८ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत बौद्ध वधू – वर मेळावा आयोजित करण्यात आले आहे.

प्रा. आयु. एस. एम. तांबे सर, प्रा.आयु. डॉ. पोटे सर, प्रा. आयु. सुरेश खरात सर, आयु. हर्षवर्धन सोनवणे, आयु. ज्ञानेश्वर खाडे, आयु. सदानंद उमाले, प्रशांत सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा आयोजित करण्यात येणार आहे.

संपर्कासाठी – आयु. कांतीलाल डोंगरदिवे – ९८८१९५०७५४ / ८४२११०२४५२

## चंचलबाई कटारिया यांचे हृदयविकाराने निधन



नगर – कायनेटीक चौकातील सौरभ कॉलनी, रविश हौसिंग सोसायटीतील रहिवासी चंचलबाई वसंतलाल कटारिया (सोनईवाला, वय ७५) यांचे १ डिसेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संप्रती क्रिएशनचे संचालक संतोष, अभय कटारिया यांच्या त्या मातोश्री होत.

## सुशिलाबाई फिरोदिया यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – टाकळी ढोकेश्वर (साकुर) येथील रहिवासी सुशिलाबाई रामचंद्र फिरोदिया (वय ९४) यांचे ३० नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर रविवारी टाकळी ढोकेश्वर (साकुर) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. संगमनेर श्रावक संघाचे सचिव वसंत फिरोदिया यांच्या त्या मातोश्री होत.

## मंदाबाई दरेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भिंगार येथील रहिवाशी मंदाबाई सुदामराव दरेकर (वय ६४) यांचे १ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात १ मुलगी, जावई असा परिवार आहे. मंदा दरेकर या पोलिस अधिक्षक कार्यालयातील सेवानिवृत्त लिपीक होत्या.

## पांडुरंग शिर्के (मेजर) यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बाबुर्डी शिर्के (ता.श्रीगोंदा) येथील रहिवाशी व उपसरपंच पांडुरंग अशोक शिर्के (मेजर, वय ४५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर बाबुर्डी शिर्के येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, २ मुले, सुना, १ भाऊ, भावजय, पुतण्या असा परिवार आहे.

## हरिदास भांबळ यांचे हृदयविकाराने निधन



नगर – पाईपलाईन रोड सूर्यनगर येथील रहिवासी हरिदास रामदास भांबळ (वय ६६) यांचे ३० नोव्हेंबरला हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना असा परिवार आहे. आयसीआयसीआय बँकेतील सचिन भांबळ यांचे ते वडील होत.

## राजेंद्र म्हस्के यांचे निधन



नगर – उक्कडगाव (ता.नगर) येथील रहिवासी राजेंद्र बबन म्हस्के (वय ५५) यांचे २१ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर उक्कडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात मुलगा, सुन असा परिवार आहे. गणेश दूध डेअरीचे संचालक गणेश म्हस्के यांचे ते वडील होत.

# पत्रकारांसाठी ३ डिसेंबरला आरोग्य शिबिराचे आयोजन



नगर – मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिन पत्रकार आरोग्य दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मराठी पत्रकार परिषदने डॉ.विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेजच्या सहकार्याने मंगळवारी (दि.३ डिसेंबर) अहिल्यानगर मधील अर्बन हेल्थ सेंटर, सावेडी येथे सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा सर्व पत्रकारांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेजचे संचालक डॉ. अभिजित दिवटे उपस्थित राहणार आहे. सदर शिबिरात ब्लड प्रेशर, शुगर लेव्हल, हिमोग्लोबिन यासह विविध आरोग्य तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत. तसेच शिबिराला येणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला हिवाळ्यात उपयोगी पडेल असे एक खास आरोग्य किट भेट दिले जाणार आहे.

# हेल्मेट सक्ती कायद्यामधून नगरला वगळावे अन्यथा 'सविनय कायदेभंग' करावा लागेल

*(पान १ वरुन)*

अहमदनगरमध्ये प्रेमदान चौक, पत्रकार चौक, दिल्ली गेट आणि सक्कर चौक या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी होत असते, परंतु त्या ठिकाणी ट्रॅफिक पोलीसाचे दर्शन होतच नाही, आणि नेहमीप्रमाणे पोलिस प्रशासनाकडून उत्तर दिले जाते की त्यांचेकडे अपुरं मनुष्यबळ आहे ते खरेच आहे. परंतु जेव्हा दंड वसुली करायचे असते तेव्हा मात्र दहा दहा पोलीस हातात दंडुके घेऊन आयुर्वेद चौकांमध्ये उभे असलेले कसे काय दिसतात? त्यावेळेस मनुष्यबळ कसे उपलब्ध होते? हे एक रहस्य आहे.

रस्ते, वाहतूक आणि सुरक्षा याबाबत अहमदनगर शहरापेक्षा उदासीन शहर जगाच्या पाठीवर शोधून सापडणार नाही, त्यासाठी प्रशासन आणि नागरिकांची मनोवृत्ती दोन्ही कारणीभूत असले तरी प्रशासनाकडून कुठलीही ठोस कार्यवाही व कठोर प्रयत्न करताना दिसून येत नाही.

अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रातील क्षेत्रफळाच्या दृष्टीनेही सर्वात मोठा जिल्हा असूनही या जिल्ह्यामध्ये सर्वात कमी पोलिस बळ तैनात केलेले आहे, याबाबत गृहमंत्री यांना नगर जिल्हा पोलिस बळाची तातडीने पुनर्बांधणी करण्यासाठी या नवीन निवडून आलेल्या लोकप्रिय व अतिकार्यक्षम सरकारने त्वरित उपाययोजना करावी आणि पुरेसे पोलीस मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. अन्यथा महात्मा गांधींच्या ब्रिटिशांच्या विरोधात असलेल्या सविनय कायदेभंगाची पुन्हा आठवण करून द्यावी लागेल. सर्व नागरिकांना आम्ही असे आवाहन करतो की जर वरील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले मुद्दे प्रशासनाकडून सोडवले गेले नाहीत तर शहरात सुद्धा हेल्मेट सक्तीसारखे केलेले हास्यास्पद कायदे कोणीही पाळू नये अशा सविनय कायदेभंग ची हाक आम्ही देत आहोत असे जागरुक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी म्हटले आहे.

# नगर येथील सुहासभाई मुळे यांच्या व्यंगचित्राची राज्य पातळीवर निवड




नगर – चतुरंग प्रतिष्ठान पुणे या सर्वात जुन्या साहित्य संस्कृतीमधील संस्थेद्वारे थोर व्यंगचित्रकार शि.द फडणीस यांना जीवनगौरव पुरस्कार निमित्ताने राज्य पातळीवर मागील आठवड्यात व्यंगचित्र स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामध्ये अहमदनगर येथील सुहासभाई मुळे यांच्या व्यंगचित्राची निवड करण्यात आली आहे.

व्यंगचित्रकार शि. द. फडणीस ज्यांची व्यंगचित्रे अर्क चित्रे आणि लहानपणापासून आपण पाठ्यपुस्तकात बालभारती पासून ते इतिहासाच्या पुस्तकातील चित्रांमध्ये अर्क चित्रे पाहत आलो आहोत. अशा थोर व्यंगचित्रकाराला नुकताच जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला असून त्या सोहळ्याच्या निमित्ताने बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे ८ डिसेंबर रोजी विशेष कार्यक्रम होणार आहे. सदर कार्यक्रमांमध्ये सुहास मुळे यांचे व्यंगचित्र प्रदर्शित करण्यात येणार आहेत, अशी माहिती चतुरंग प्रतिष्ठान, पुणे द्वारे दिली गेली आहे.

व्यंगचित्र ही एक अतिशय दुर्मिळ आणि दर्जेदार कला असून जी गोष्ट एक पानभर वर्णन करून लिहून सांगितली जाऊ शकत नाही ती केवळ काही रेषांचे फटकारे मारून व्यंगचित्राच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडता येते.. आणि यामध्ये मुळे यांची सुमारे ६०० व्यंगचित्रे आजतागायत अनेक मासिकांमधून प्रसिद्ध झालेली आहेत,

सुहास मुळे यांनी दै. नवा मराठातील मतदार जागृती अभियान या सदरामध्ये अनेक अर्थपूर्ण व दर्जेदार व्यंगचित्रे दिली होती. याबाबत चतुरंग प्रतिष्ठान, यांनी परीक्षण करून मुळे यांच्या व्यंगचित्रांची निवड केली. त्यांचे साहित्य वर्तुळात अभिनंदन होत आहे.




सिव्हिल हडको पोस्ट ऑफिस समोरील जैन धर्मस्थानक परिसरातील मीरा मेडिकल जवळ घरांच्या ड्रेनेजलाईनवरील अतिक्रमणे, जिना, भिंतीचे अडथळे हटविण्याचे काम महापालिकेच्यावतीने सुरु आहे. याप्रसंगी प्रभाग समिती १ सावेडी क्षेत्रीय अधिकारी अर्जुन जाधव व अतिक्रमण विरोधी पथक. (छाया– बबलू शेख)

# गृहिणी

## आरोग्य

### योगासनांचा असाही लाभ

योगामुळे ऐकण्याची क्षमता सुधारू शकते. योगासनांमुळे शरीरातील रक्त परिसंचरण सुधारते, ज्यामुळे कानांना ऑक्सिजन आणि पोषक तत्वांचा पुरवठा वाढतो. यामुळे कानाच्या पेशी निरोगी राहण्यास मदत होते आणि ऐकण्याची क्षमता सुधारते.

## पाककला

### व्हेजिटेबल ज्यूस

**साहित्य –** २ ते ३ ताजे बीट, ३ ते ४ ताजे आवळे, १ इंच आल्याचा तुकडा, २ ते ३ मीडियम साइज गाजर, १ कप अननसाचे काप, १ ग्लास कोमट पाणी, मीठ, काळे मिरे पूड, १ छोटा चमचा लिंबाचा रस

**कृती –** सर्वात आधी बीट आणि आले सोलून स्वच्छ धुवून बाजूला ठेवावे. आता आवळ्याच्या बिया काढून त्याचे २-३ तुकडे करावे. जर तुम्ही फळे किंवा इतर भाज्या घालत असाल तर त्या सोलून बारीक करावे आणि बाजूला ठेवावे. यानंतर मिक्सरमध्ये बीटरूट, गाजर, आले, आवळा, अननस आणि १ ग्लास कोमट पाणी घालून मध्यम तुकडे करून बारीक करावे. आता एका मोठ्या भांड्यात गाळणे ठेवावे आणि रस गाळून घ्यावा. यानंतर या रसात थोडी काळी मिरी पूड, काळे मीठ आणि लिंबाचा रस घालून मिक्स करून सेवन करावे.

## सौंदर्य

### त्वचेवर चमक आणण्यासाठी हायलाइटर

✻ तुमच्या चेहऱ्यावर नैसर्गिक चमक हवी असेल तर तुम्ही पेट्रोलियम जेलीचा वापर हायलाइटर म्हणून करू शकता. ते गालाच्या हाडांवर, नाकाच्या वरच्या भागावर आणि भुवयांच्या हाडांवर लावा. यामुळे तुमचा चेहरा नैसर्गिकरित्या चमकेल.

✻ जर पापण्या लांब आणि जाड दिसाव्यात, तर रात्री झोपण्यापूर्वी त्यावर हलकी प्रमाणात पेट्रोलियम जेली लावा. यामुळे तुमच्या पापण्यांचे पोषण तर होईलच पण ते तुटण्यापासूनही बचाव होईल.

## वास्तू

✻ जेव्हा तुम्ही झोपता, तेव्हा तुमचे डोके दक्षिणेकडे किंवा पूर्वेकडे असले पाहिजे आणि तुमचे पाय उत्तरेकडे किंवा पश्चिम दिशेकडे असले पाहिजेत. अशा प्रकारेच तुमचे शरीर सकारात्मक ऊर्जा शोषून घेत असते.

## सल्ला

✻ मुख्य दरवाजाला काळा रंग देवू नये.

✻ घराचा दरवाजा घडाळाच्या दिशेने उघडला गेला पाहिजे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, मूळ १६।४२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : दैनंदिन कामापासून विश्रांतील मिळेल. कुटुंबियांसमवेत दिवस आनंदात जाईल.

**वृषभ** : स्वत:च्या क्षमतांचा चांगला वापर कराल. मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल.

**मिथुन** : आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल.

**कर्क** : तुमच्या हातातून पैसे हरवतील. कुंटुंबातील सदस्यांच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करुन त्या पूर्ण कराल.

**सिंह** : आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपली स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

**कन्या** : आर्थिक आघाडीवरील सुधारणा महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील.

**तूळ** : एका कठीण काळानंतर आजच्या दिवशी तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसेल.

**वृश्चिक** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. भाऊबंद डोके वर काढतील. दिवस बोरिंग वाटेल.

**धनु** : आशावादी रहाल. कामे वेळेवर होतील. मात्र कष्टही करावेच लागतील.

**मकर** : आज तुमच्याजवळील उत्तम संकल्पना आणि तुम्ही केलेल्या कृती यामुळे तुम्हाला अपनेक्षीत फायदा होईल.

**कुंभ** : आजच्या दिवशी जुन्या मित्रांबरोबर बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल.

**मीन** : चिंता सोडून द्याल आणि आपल्या रोमॅण्टीक जोडीदाराच्या सहवासाचा आनंद घ्याल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**सासू –** प्लेट घासल्यावर त्यात चेहरा दिसेल इतकी स्वच्छ करत जा


**सुन –** उद्यापासून आरशावरच जेवत जा

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

✻ इटालियन लोकांनी १८८० मध्ये कोणत्या देशाची वसाहत निर्माण केली? – अरिट्रीया
✻ आफ्रिकेतील कोणत्या देशास आफ्रिकेचे मृत ह्रदय असे संबोधले जाते? – चाड वाळवंट
✻ आफ्रिकेतील कोणता देश हा नव्याने आफ्रिका महासंघाचा सदस्य आहे? – मोरोक्को
✻ जगातील सर्वात गरीब देश कोणता? – मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६२ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७०६१ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) आश्चर्यकारक; नवलाचे ३) हंगाम; विपुलता; पराकाष्ठेची मौज ५) मुस्लिमांची किंवा ख्रिश्चनांची दफनभूमी ८) नांगीने दंश करणारा एक विषारी जीव १०) भक्त किंवा सेवक यांचा समूह ११) आकाश; अंबर; गगन १३) पाणथळ किंवा चिखलाची जमीन १६) उंट हकणारा १८) शासन; गव्हर्नमेंट २०) दासी; सेविका २३) बाण सोडल्यानंतर येणारी धनुष्याच्या दोरीचा आवाज २४) जहाज; होडी; गलबत; सैन्याचा तळ; तंबू

**उभे शब्द :-** १) एक फूल; कमळ; सरोज; नीरज २) एक पक्षी; बगळा ३) लग्नासाठी खरेदी केलेल्या कापडांचे गाठोडे ४) वध; हिंसा ६) काख ७) लढाई; लढाईचे मैदान; वाळवंट ९) स्वयंपाक वगैरे ज्यावर करतात ती अग्नीची भट्टी ज्यातून धूरही निघतो १२) देवाला आळवण्याचा एक प्रकार ज्यात टाळ या वाद्याचा वापर हमखास केला जातो १४) ठोसा; दंगा; गदारोळ; प्रहार १५) मूल; बच्चा १७) अनेक कुटुंबे जेथे राहतात ते मोठे घर १८) मैदा; सोजी १९) एक स्थितिस्थापक पदार्थ ज्यापासून टायर, ट्यूब वगैरे वस्तू तयार केल्या जातात २१) चहा पिण्याचे एक भांडे २२) शंकर; महादेव; नीळकंठ

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जीवनातील सर्वात मोठे गुरू म्हणजे आपले अनुभव.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### लिफ्टचा शोध कोणी लावला?

जसजश्या इमारती उभ्या राहायला लागल्या, तशी शहरं आणि तिथं राहणारी लोकसंख्या वाढत गेली. पण इमारतींची उंची अजूनही मर्यादितच होती. कारण सोपं होतं – इतक्या वर जाणार कोण, राहणार कोण?

एका इंजिनिअरने गुरुत्वाकर्षणाला झुगारून वस्तू आणि माणसांना हलवता येईल अशी यंत्रणा तयार केली. ही यंत्रणा म्हणजे एलिवेटर किंवा लिफ्ट.

साहजिकच आधी राजवाड्यांमध्ये लिफ्ट लागल्या. त्यांना ने-आण करण्यासाठी एक विश्वासू बाहुबली नेमलेला असायचा. कालांतराने प्राण्यांकडून या लिफ्ट ओढण्याचं काम सुरू झालं. व्यावसायिकरीत्या वीज उपलब्ध झाल्यावर या लिफ्टचं विद्युतीकरण झालं. लिफ्टनेही तेच झालं जे सिमेंट कॉंक्रीटनं झालं – इमारतींची उंची वाढू लागली, त्यामुळे शहरं ऐसपैस वाढण्यासोबतच उंचउंचही होऊ लागली, नवनव्या गगनचुंबी इमारती उभ्या आहेत त्या याच कारणामुळे की त्यांच्यात लिफ्ट आहेत.

लिफ्टचा शोध लावणाऱ्या एलिशा ओटिस यांनी लोकांना यामध्ये प्रवास करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी या लिफ्टचं सार्वजनिक प्रात्यक्षिक दाखवलं. त्यात त्यांनी लिफ्टचा दोर तुटून लिफ्ट पडली तरी तुम्ही सुरक्षित राहाल, हेही दाखवलं. तेव्हा कुठं जाऊन लिफ्टचा उपयोग प्रचलित झाला. परंतु सुरुवातीच्या काळात लिफ्टच्या वापराविषयी लोकांमध्ये मनात भिती बसली असणार हे मात्र खरे.

### विश्वासघाताचे फळ

धर्मबुद्धी आणि पापबुद्धी हे दोन मित्र हिम्मत नगरमध्ये राहत होते. एकदा पापबुद्धीच्या मनात विचार आला की मी माझ्या मित्र धर्मबुद्धीसोबत दुसऱ्या देशात जाऊन पैसे का कमवू नंतर, कोणत्या ना कोणत्या युक्तीने, मी त्याचे सर्व पैसे हिसकावून घेईन आणि आनंदी आणि शांत जीवन जगेन. वाईट नीती मनात ठेऊन पापबुद्धीने धर्मबुद्धीला धन आणि ज्ञान मिळवण्याचे आमिष दाखवून आपल्यासोबत बाहेर जाण्यास तयार केले. तसेच शुभ मुहूर्त पाहून दोन्ही मित्र दुसऱ्या शहरात निघून गेले. निघताना त्याने भरपूर माल सोबत नेला आणि विचारलेल्या किमतीत विकून भरपूर पैसा मिळवला. शेवटी आनंदी मनाने ते गावी परतले.

आता गावाजवळ आल्यावर पापबुद्धीने धर्मबुद्धीला सांगितले की, माझ्या मते सर्व पैसे एकाच वेळी गावात घेऊन जाणे योग्य नाही. काही लोकांना आपला हेवा वाटू लागेल, तर काही लोक कर्जाच्या स्वरूपात पैसे मागू लागतील. आपण काही पैसे जंगलातच सुरक्षित ठिकाणी पुरले पाहिजे. तसेच साध्या मनाच्या धर्मबुद्धीने पुन्हा पापबुद्धीच्या कल्पनेला सहमती दर्शवली, त्याच वेळी दोघांनीही सुरक्षित ठिकाणी खड्डा खणला आणि आपले पैसे पुरले आणि घराकडे निघाले.

नंतर एके रात्री संधी साधून पापबुद्धीने गुपचूप तेथे पुरलेले सर्व पैसे काढून घेतले आणि काही दिवसांनी धर्मबुद्धी पापबुद्धीला म्हणाल भाऊ, मला थोडे पैसे हवे आहे. तेव्हा तुम्ही माझ्यासोबत या. पापबुद्धीने लगेच रडण्याचे आणि किंचाळण्याचे नाटक केले. धर्मबुद्धी याच्यावर पैसे काढल्याचा आरोप पापबुद्धीने केला. आता दोघांमध्ये कडाक्याचे झाले व भांडण करत दोघेही राजापर्यंत पोहोचले. दोघांनीही आपापली बाजू राजासमोर मांडली. राजाने सत्य शोधण्यासाठी तपासणी करण्याचे आदेश दिले. दोघांनाही एक एक करून धगधगत्या आगीत हात घालावे लागले. पापबुद्धीने याला विरोध करत म्हणाला की वनदेवता साक्ष देईल असे सांगितले. राजाने हे मान्य केले. आता पापबुद्धीने वडिलांना झाडाच्या पोकळीत बसवले. व वनदेवतेचा आवाज काढण्यास सांगितले. न्यायाधीशांनी विचारले असता धर्मबुद्धीने चोरी केली आहे, असा आवाज आला. मग धर्मबुद्धीने झाडाखाली आग लावली. झाड जळू लागले आणि त्यासोबत पापबुद्धीचे वडीलही रडू लागले आणि मोठ्याने ओरडू लागले. काही वेळाने पापबुद्धीचे वडील आगीत जळलेल्या झाडाच्या मुळातून बाहेर आले. तेव्हा वनदेवतेच्या साक्षीने खरे रहस्य उलगडले. आता राजाने पापबुद्धीला फाशीची शिक्षा सुनावली आणि त्याचे सर्व पैसे धर्मबुद्धीला दिले.

तात्पर्य – कोणाचाही विश्वासघात करू नये.

## रहमते दर्शन (भाग – १)



### प्रस्तावना

अपने गुरु के ध्यान और आध्यात्मिक अभ्यास में लगे रहने लगे थे। उस आध्यात्मिक माहौल का प्रभाव दर्शन पर पड़ना अनिवार्य था। आँख खोलते ही वे अपने माता-पिता को अभ्यास में बैठे पाते और उनकी देखा-देखी स्वयं भी उनके निकट आँखें बंद करके बैठ जाते। इस प्रकार उन्हें बचपन में ही आध्यात्मिक जीवन की धरोहर मिल गयी।

अभी दर्शन की आयु पाँच वर्ष की ही रही होगी कि अपने पूज्य पिता के साथ हुज़ूर बाबा सावनसिंह जी महाराज के दर्शन के लिए डेरा ब्यास जिला अमृतसर के लिए रवाना हो गये, माता-पिता के अभ्यास या साधना को देख कर उनके मन में भी नामदान पाने की इच्छा जागी और उनमें परम संत-सत्गुरु के प्रति श्रद्धा पैदा हो गयी। फलतः जैसे ही उन्हें हुज़ूरी छवि के दीदार का सौभाग्य प्राप्त हुआ, तो उन्होंने बाबा सावनसिंह जी महाराज से नामदान पाने की प्रार्थना कर दी। परम पूज्य बाबाजी ने उन्हें प्यार किया और कहा, ठहर, अभी तुझे मीठा-मीठा ईनाम देते हैं। यह कहकर उनके हाथों में मिठाई दे दी, लेकिन बालक दर्शन मचल गया और उसने कहा, मुझे यह नहीं, वह नाम दीजिये जो बाऊजी (पिताजी) को दिया है। परम संत ने शाम के समय आने का आदेश दिया। जब वे शाम को वहाँ पहुँचे, तो संत-सत्गुरु ने कहा, 'आँखें बंद कर के बैठ जा और अंधेरे में देख। बालक दर्शन ने देख कर कहा, अन्दर रोशनी है। फिर आदेश हुआ ध्यान से देखो। बालक ने कहा, अन्दर आसमान है, और ध्यान से देखने की आज्ञा पर बताया, 'आसमान पर तारे नज़र आते हैं। हुज़ूर ने कहा, 'बस तुम्हारे लिए इतना ही बहुत है। दर्शन जी दौड़े-दौड़े अपने पिता तक पहुँचे और कहा कि मुझे तो तारों तक नाम मिला है। इस घटना के आठ बरस बाद उन्हें नियमानुसार गुरुमंत्र मिला। इस अनुभव के बाद दर्शनसिंह जी ने एक गज़ल कही जिसका पहला शेर है,

खाक से ता-ब-कहकशां, हमने तो जब किया सफ़र इश्क मिला क़दम क़दम, हुस् मिला नज़र-नज़र – मताए-नूर (उर्दू गज़ल -१)

(धरती से आकाश गंगा तक हमने सफ़र किया, तो हमें कदम-कदम पर अध्यात्म की प्रारम्भिक शिक्षा-दीक्षा ने संत जी के जीवन को विचारों की पवित्रता, दूरदर्शिता, संत स्वभाव और दीनता के भाव के सांचे में ढाल दिया और बचपन में जो रुझान पैदा हुआ था, उसमें नयी और स्थायी चमक आ गयी। इस तरह अपनी पहचान से प्रभु पहचान तक का सफ़र बड़ी तीव्र गति से तय हो गया। यदि हम विचार करें तो उनकी पुस्तकों के नामों से समझ सकते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

समय प्रबन्धन और दूसरों को बदलना प्रत्येक व्यक्ति का अमूल्य समय किसी न किसी दूसरे व्यक्ति को बदलने में सब से ज्यादा बर्बाद होता है। दूसरों को बदलते बदलते हम मानसिक परेशानियों पाल लेते हैं। ये जितने भी शारीरिक रोग हैं उनका कारण मानसिक परेशानियों ही हैं। दूसरों को बदलने की भावना है। हम सोचते हैं। हम आगे नहीं बढ़ पाते क्योंकि पति, पत्नी, बास अथवा संगठन मुखिया आगे नहीं बढ़ने देता। सभी की सोच अपनी है। हरेक व्यक्ति एक हिमालय पर्वत है। आप हिमालय पर्वत को इस के स्थान से नहीं हटा सकते। उसकी साइड से गुजर जाओ। हम सिर्फ अपने को बदल सकते हैं। जब हम अपने को ही नहीं बदल सकते तो दुसरा व्यक्ति हमारे अनुसार क्यों बदलेगा। इस मनोवृति को बदल लो नहीं तो सारी जिंदगी संघर्ष में बीत जाएगी। आप मन में उन व्यक्तियों को देखते रहो जो आप के सहयोगी है, आप से कोई अनबन नहीं, कोई विरोध नही, कभी झड़प नहीं हुई। इस से आप को मानसिक बल मिलेगा। इस से मन में शांति और उत्साह रहेगा। खुशी रहेगी। काश ऐसा होता तो मजा आ जाता। इस से नकारात्मकता पैदा होती है और समय नष्ट होता है। वर्तमान में देखो, सिर्फ सोचो मैं क्या कर सकता हूं? वही करो जो आप के बस में है। किसी स्नेही से मन मुटाव हो गया। वह आप से प्यार नहीं करेगा। आप के बस में यह है कि उसे एक तरफा प्यार करते रहें। धीरे धीरे सब ठीक हो जाएगा। मुझे कोई नहीं चाहता, कोई नहीं समझता, ये गलत सोच है। जब आप लोगों के बीच जाते हैं, आप अपना ध्यान भगवान में, ईष्ट में, विश्व सेवा में, शुभ चिन्तन में लगाए रखें, तब आप को खुशी रहेगी, किसी से चाहत नहीं होगी। यही समय का उचित प्रबन्धन है।

समय प्रबन्धन और विचार

एक इन्सान दूसरे इन्सान के संपर्क में कई बहानो से आता है। प्रत्येक व्यक्ति की चाहत होती है कि दूसरे उसे पसंद करें। चाहे वह घर की बात हो या आफिस की या किसी पार्टी में जाने की। हर कोई अपने को दूसरे से अलग देखना चाहता है। अलग दिखने व लोगों के दिलों दिमाग पर छाने के लिये जरूरी है। अपने विचारों का प्रबन्धन और विचारों के प्रबन्धन से समय बचेगा। नहीं तो समय के साथ साथ मानसिक ऊर्जा नष्ट होती रहेगी और दूसरों की पसंद भी नहीं बन सकेंगे। बातचीत करना एक कला है। बातचीत में शब्दों का, आवाज का और बोलने के ढंग का बहुत महत्वपूर्ण प्रभाव होता है। बातचीत का ढंग हमारे दिमाग का आईना है। हमारे शब्द, स्वर और इशारे हमारे मानसिक स्तर को दिखाते हैं। आवाज और बात करने का ढंग सारे राज खोल देता है, जिसे हम छुपाते हैं।

ऐसी भाषा का चुनाव करें जो दूसरे को हर्ट न करें। मन में अहंकार और व्यंग होगा तो आप की वाणी किसी को अच्छी नहीं लगेगी। हंसी मजाक में आहत करने वाली वाणी से आप के ह्रदय के भाव प्रकट हो जाते हैं। इसलिये मन में आहत करने वाले भाव न हो। जब मन में आहत करने का भाव आए तो तुरंत मन में शिव बाबा देखो और कहो आप प्यार के सागर हैं। इसे बार बार कहते रहना जब जब ऐसा भाव आए। ऐसा करने से आहत करने वाले भाव ख हो जाएंगे।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### मधुर स्वरसंगीताचे महत्त्व

गायन, वादन व नृत्य या तीन कलांना मिळून 'संगीत' असे म्हणतात. जसे लहान बाळापासून ते वयोवृध्दांपर्यंत सुमधुर स्वरसंगीत सर्वांनाच आवडते. तसेच ते गर्भस्थ बालकाला देखील ऐकायला आवडते. संगीतातील गायन, वादन हे दोनही प्रकार गर्भस्थ बालकाला आवडत असतात. गर्भावस्थेत बाळाशी संवाद साधताना संगीताचा चांगल्या प्रकारे उपयोग होतो. गर्भाच्या पंचेंद्रियांचा विकास चांगला होण्यासाठी, बाळाच्या बुद्धीची वाढ चांगली होण्यासाठी बाळाला सतत काहीतरी चांगले ऐकवत राहणे महत्त्वाचे असते. शास्त्रीयसंगीताचा मी स्वत: अभ्यास करीत आहे. शास्त्रीयसंगीतातील ज्ञान मिळवित असताना गर्भस्थ बाळासाठी तसेच गर्भवती स्त्रीसाठी यातील कोणत्या रागांचा उपयोग होऊ शकतो याचा अभ्यास केला. गर्भावस्थेमध्ये गर्भवतींचे हार्मोन्स कमी-जास्त होत असतात; त्यामुळे राग येणे, छोट्याशा कारणावरून रडायला येणे, अबोला धरणे, नैराश्य येणे, नकारात्मक विचार मनामध्ये जास्त येणे या गोष्टी जास्त घडत असतात. गर्भनाळेमार्फत हे सर्व नकारात्मक विचार बाळापर्यंत पोहोचतात व त्यामुळे बाळदेखील नकारात्मक विचारांचे, दुःखी होऊ शकते. असे होऊ नये म्हणून मातेने सकारात्मक, आनंदी, प्रसन्न विचारांमध्ये राहणे महत्त्वाचे असते. संगीत ऐकल्याने माता आनंदी, प्रसन्न राहते. जास्तीत जास्त काळ सकारात्मक विचारांमध्ये राहिल्यामुळे शरीरातील हार्मोन्स संतुलित राहतात; त्यामुळे गर्भनाळेमार्फत बाळाची वाढ चांगली होते व मानसिक अवस्था देखील चांगली होते. शास्त्रीयसंगीताचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, बाळाला यमन, केदार, आसावरी हे राग खूप आवडतात. ह्याच्या सीडीज बाजारामधे उपलब्ध असतात. त्याच प्रमाणे बाळाला आवडतील अशी बडबड गीते ऐकली किंवा बघितली तरी मन आनंदित होते. गर्भावस्थेमध्ये ऐकलेली अंगाई गीते जन्म झाल्यानंतर बाळाला ऐकविल्यास बाळ रडायचे थांबून लगेचच झोपते, कारण तो आवाज बाळाला ओळखीचा वाटतो. म्हणून गर्भावस्थेत मातेने भक्तीसंगीत, शास्त्रीयसंगीत, अंगाईगीते, बडबड गीते, प्रेरणा गीते, देशभक्तीपर गीते ऐकावीत. त्याच बरोबर मधुर आवाजातील तबला वादन, तानपुरा, बासरी, एखादा मंत्र, श्लोक, गायत्री मंत्र वारंवार ऐकावा. संगीत ऐकल्याने मन आनंदित राहते व बाळाची कर्णेद्रिय सक्षम होऊन बाळाचा बुध्यांक वाढतो व बाळाची शारीरिक, मानसिक वाढ व्यवस्थित होते. तसेच संगीतामुळे गर्भवती मातेचे मन प्रसन्न राहिल्यामुळे उच्च रक्तदाब, मानसिक नैराश्य हे आजार सहसा उद्भवत नाहीत, गर्भावस्थेमध्ये नेहमी ऐकलेले संगीत प्रसूतीच्या वेळेस प्रसृतिगृहात सौम्य आवाजात

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३४ व्या स्मृतीदिनानिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करताना संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे आदी.

# नेत्रदान व अवयवदानच्या जनजागृतीने महात्मा फुले यांचा स्मृतीदिन साजरा

## फिनिक्स सोशल फाऊंडेशनने भरले नागरिकांचे संकल्प अर्ज

नगर – महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३४ व्या स्मृतीदिनानिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तर यावेळी मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानाची जागृती करण्यात आली.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानाचे महत्त्व विशद करुन नागरिकांना संकल्प अर्जाचे वाटप केले. यावेळी अभिषेक चिपाडे, किरण जावळे, राजेंद्र बोरुडे, रमेश चिपाडे, विनायक नेवसे आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, समाजात महापुरुषांच्या विचारांचा अंगीकार करुन त्यांचे विचार पुढे घेऊन जाण्याची गरज आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी अतोनात हाल अपेष्टा सहन करून शिक्षणाची मूर्तमेढ रोवली. त्यांच्या कार्याने समाज सावरला गेला आहे. आज समाजाने देखील महापुरुषांच्या त्यागाची जाणीव ठेऊन मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान करणे काळाची गरज बनली आहे. मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान होत नसल्याने अनेक रुग्ण नेत्र व अवयवाच्या प्रतिक्षेत आहे. एका व्यक्तीच्या अवयवदानाने सात व्यक्तींना जीवदान मिळते. शरीर हे नश्वर असून, मरणोत्तर अवयवदानाने एखाद्याचे जीवन फुलणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांचे नेत्रदान व अवयवदानाचे संकल्प अर्ज भरुन घेण्यात आले.

# रक्तदान करूनच रक्ताची गरज भागवता येते

## खालीद जहागीरदार यांचे प्रतिपादन; शहीद दिनाचे औचित्य साधून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रक्तदान शिबीर



माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटी, एचडीएफसी बँक, एनएसएस आयटीआय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने २६/११ च्या हल्ल्याच्या निषेधार्थ शहीद दिनाचे औचित्य साधून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये रक्तदान शिबीर घेण्यात आले. (छाया–समीर मन्यार)

नगर – ईश्वराने आपल्याला मानव जन्म दिला आहे आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून सर्वांनी सामाजिक उपक्रमांचा भाग बनले पाहिजे. रक्तदान शिबिर हा एक सामाजिक उपक्रम आहे. दिवसेंदिवस रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. अपघाताचे वाढते प्रमाण त्यामुळे झालेला अतिरिक्त रक्तस्राव, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही, रक्ताची आवश्यकता असल्यास रक्तदान करूनच रक्ताची गरज भागवता येते. प्रत्येक शाळा महाविद्यालयामध्ये दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केल्यास रक्ताचा भासणारा तुटवडा हा मोठ्या प्रमाणावर दूर होईल त्यामुळे अनेकांना जीवदान मिळेल. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे प्रतिपादन कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अहिल्यानगरचे प्राचार्य खालीद जहागीरदार यांनी केले.

कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अहिल्यानगर, रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटी, एचडीएफसी बँक, एनएसएस आयटीआय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने २६.११.२००८ रोजी झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ शहीद दिनाचे औचित्य साधून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य खालीद जहागीरदार बोलत होते.

याप्रसंगी एचडीएफसी बँकेच्या क्लस्टर हेड उज्वल कुंभोजकर शाखाधिकारी, श्रीनिवास पिंगळे, प्रसाद रसाळ, भीमसेन भंडारी, रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटीचे सचिव निखिल कुलकर्णी, रो.रफिक मुंशी, रवी डिक्रुझ, जिल्हा संक्रमण अधिकारी सुमय्या खान, गरजे सर, संतोष काळे, हेमंत लोहगावकर आदींसह विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

यावेळी सहाय्यक आयुक्त तथा अध्यक्ष रोटरी इंटिग्रीटी क्लब अ. नगरचे रफिक मुन्शी म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्था नगर येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. रक्तदानाची ही चळवळ कौतुकास्पद असून नगरला भूषणावह आहे. नैसर्गिक आपत्ती आणि अपघात प्रसंगात रक्त पुरवठा आवश्यक असतो, तसेच थँलेसेमीया मेजर करीता रुग्णास विहित वेळेस रक्ताची आवश्यकता असते. त्यामुळे रक्तदान शिबीर आयोजित करित असताना महाविद्यालय येथील एन.एस.एस. प्रमुख व विद्यार्थी वर्गाशी संपर्क साधल्यास रक्तदात्याची संख्या वाढ होईल, अशी सूचना यावेळी त्यांनी मांडली.

एचडीएफसी बँकेचे अधिकारी उज्वल कुंभोजकर व श्रीनिवास यांनी बँक सामाजिक भान ठेवून अशा शिबीरास पूर्ण सहकार्य करीत असल्याचे सांगितले. जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी श्रीमती खान मॅडम यांनी रक्त गट कसे असतात, रक्ताचे दान केल्यानंतर रक्त कसे शरीरात पुन्हा तयार होते याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी. ई खाकाळ यांनी केले तर आभार व्ही. एल. बेंद्रे यांनी मानले.

# चित्रकूट गुरूकुलतर्फे ८ डिसेंबरला शिक्षकांचा 'द फाऊंडेशन बिल्डर ॲवार्ड'ने होणार सन्मान




नगर – समाजाचा सर्वांगीण विकास साधून राष्ट्र निर्माणात योगदान देणारी पिढी घडविण्याचे काम शिक्षक, शिक्षण संस्थाचालक करत असतात. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या अशा शिक्षकांचा चित्रकुट गुरूकुलच्यावतीने द फाऊंडेशन बिल्डर अवार्डने सन्मान करण्यात येणार आहे. ८ डिसेंबर रोजी हॉटेल राजयोग येथे हा कार्यक्रम होणार आहे अशी माहिती चित्रकुट गुरुकुलच्या प्राचार्या सारिका आनंद यांनी दिली.

चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे संचालक संजय चव्हाण, सीईओ अशोक सचदेव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होणार आहे. अहिल्यानगर परिसरातील विविध शाळांचे २०० हून अधिक प्राचार्य, शिक्षक या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत. यावेळी शिक्षण, व्यवसाय, तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर मंडळी सहभागी होऊन भविष्यातील शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नवनवीन तंत्रज्ञान व शिक्षण पद्धती यावर विचार मांडतील. शिक्षक फक्त पुस्तकी ज्ञान देत नाही तर मुलांमध्ये नीतीमूल्य, संस्कार रूजवून त्यांना भविष्यातील स्पर्धेच्या युगासाठी अधिक सक्षम बनवतात. त्यांच्या कार्याचा गौरव यानिमित्त करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी सन १९४६ पासून सर्वोत्तम व विश्वसनीय सुवर्ण सेवा देणारे सहदेव ज्वेलर्स, सिंपली सायन्स ही नवीन शैक्षणिक धोरणानुसार शाळांमध्ये अत्याधुनिक अध्यापन पद्धतीसाठी पुढाकार घेणारी संस्था, ओमोटेक ही संस्था जी संशोधन आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमात अग्रेसर आहे आणि रेक्स शूज ही भारतातील अग्रगण्य फुट वेअर निर्माता कंपनीचे सहकार्य लाभले आहे.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी कॉलेजचे प्रा. योगेश पठारे यांना पी.एच.डी. प्रदान



नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयचे प्रा. योगेश संजय पठारे यांना इंदोरमधील ओरीएन्टल विद्यापीठ मेकॅनिकल इंजिनीअरींग या विषयावर यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पी. एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. सदर अभ्यासक्रमात त्यांना भोपाळ येथील सागर इन्स्टिट्यूट चे मेकॅनिकल विभागाचे इंजिनियर डॉ.मनिष बिल्लोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. योगेश पठारे यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी इंटरनॅशनल स्कोपस या जर्नल्समध्ये ०३ पेपर प्रेझेंटेशन केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ०२ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे.

त्यांच्या या सुयशाबद्दल उपसंचालक सुनिल कल्हापुरे प्राचार्य डॉ.उदय नाईक तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एम. गायकवाड आदींनी कौतुक केले.

# मुकुंदनगरच्या ज्येष्ठ नागरिक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार

## आमदार संग्राम जगताप यांनी दिलेल्या ५६ लाखाच्या निधीतून सभागृहाचे काम प्रगतीपथावर, अभिनंदनाचा ठराव



फकिरवाडा, दर्गादायरा, मुकुंदनगर येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी उपस्थित सदस्य.

नगर – फकिरवाडा, दर्गादायरा, मुकुंदनगर येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत ज्येष्ठ नागरिक संघाच्या कंपाउंड वॉल व सभागृहासाठी ५६ लाखांचा निधी दिल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचे आभार मानून, तिसऱ्यांदा आमदारपदी निवडून आल्याबद्दल त्यांचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला.

सभेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून हाजी शौकत तांबोळी, हाजी लतीफ मलबारी, माजी नगरसेवक आसिफ सुलतान, फारुकभाई, नवेद बिजापुरे, हाफिज कादरी, अध्यक्ष हाजी खानसाहब उस्मानमिया शेख, उपाध्यक्ष हाजी शेख रउफ मोहम्मद (बिल्डर), कार्याध्यक्ष हाजी खान आलम शफी, सचिव पठाण बशीर अब्दुल, सहसचिव हाजी शेख फकिर मोहम्मद ईमाम, खजिनदार पठाण इस्माईल हबीबखाँ, कार्यकारणी सदस्य हाजी शेख बिलाल अहमद, हाजी शेख अब्दुलकादीर गुलामरसुल, शेख अब्दुलरहिम (गोटु जहागीरदार), पठाण इब्राहिम हबीबखा, मिर्झा नवेद अंजुम गयासुल हक, शेख हबीब जमाल, सय्यद इकबाल गुलाम दस्तगीर, ॲड. सय्यद मो. अन्वर इब्राहिम, अब्दुल अजीज हैदरमियाँ, शेख गुलामदस्तगीर मोहीद्दीन, शेख इस्माईल पापामियाँ, हाजी शेख अब्दुल सईद हाफिज, सय्यद आरिफ नन्हेमियाँ, हाजी शेख शरफोद्दीन जैनुद्दीन, पठाण हबीब मगबुल, सय्यद नुरमोहंमद बाबासाहेब, कायदेशिर सल्लागार, ॲड. हाफिज जहागीरदार, ॲड. ताज अशरफ सय्यद आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिक संघाच्या स्थापनेला १९ वर्षे पूर्ण होत आहे. आजी–माजी सदस्यांनी मेअराज मस्जिदजवळ ११.१५ गुंठे जागा मिळवण्यासाठी प्रयत्न केले. यासाठी मनपाचे माजी विरोधी पक्षनेते बाळासाहेब बोराटे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या जागेत ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. लोकवर्गणीतून या जागेवर तारेचे कंपाउंड टाकून पत्र्याचे शेड उभारण्यात आले आहे. माजी अध्यक्ष पै. शहा निजाम नन्हेंमिया व माजी कार्याध्यक्ष पै. बशीर पापाभाई शेख यांच्या निधनाने रिक्त झालेल्या जागी संघटना कार्यकारिणीच्या मिटींगमध्ये झालेल्या ठरावानुसार अध्यक्षपदी हाजी खानसाहब उस्मानमियाँ शेख तर उपाध्यक्षपदी हाजी रउफ मोहम्मद शेख (बिल्डर) व कार्याध्यक्षपदी हाजी आलम शफी खान यांची सर्वानुमते निवड करण्यात आलेली आहे.

नवीन कार्यकारिणीने आमदार संग्राम जगताप यांची भेट घेवून सदर जागेस कंपाउंड वॉल व सभागृह बांधण्याबाबत निवेदन दिले होते. त्याची दखल घेऊन आ. जगताप यांनी तातडीने ५६ लाखांचा निधी मंजुर केलेला आहे. तसेच सभागृहाचे काम सध्या सुरु असल्याची माहिती ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने देण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी ज्येष्ठ नागरिक संघास आर्थिक मदत दिली. सभेत झालेल्या वार्षिक कार्याचा आढावा घेऊन, सदर जागेत झाडे लावणे, जॉगिंग ट्रॅक तयार करण्याचे काम प्रस्तावित करण्याचे नियोजन करण्यात आले. तर विधवा महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यावसायिक प्रशिक्षण कार्यशाळा घेणे, युवकांसाठी वाचनालय उभारणे, ज्येष्ठ नागरिक भवनला सेवानिवृत्त आरटीओ सय्यद शहा नन्हेमिया यांचे नाव देण्याचा ठराव घेण्यात आला.

# एसा प्रीमियम लीग बॉक्स क्रिकेट स्पर्धेतून सांघिकतेचे प्रदर्शन घडवले जाते

## रौनक अंदानी यांचे प्रतिपादन; आर्किटेक्टस् इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन आयोजित एसा प्रीमियम लीग बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन



एसा प्रीमियम लीग बॉक्स क्रिकेट सिझन २ पॉवरड बाय एस आर जे स्टील या स्पर्धेचे उद्घाटन रौनक अंदानी यांच्या प्रमुख उपस्थितीत व एसा अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, एसा भवन कमिटी अध्यक्ष इक्बाल सय्यद आणि एस आर जे स्टीलचे अविनाश पुरोहित यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

नगर – आर्किटेक्टस् इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स हे शहरातील एक नामांकित संस्था असून ते दिशादर्शक काम करतात त्यामुळे युवकांना चांगली प्रेरणा व ऊर्जा मिळत असते, आर्किटेक्टस् इंजिनीअर्स हा समाजातील एक महत्वाचा घटक आहे, सध्याच्या धकाधकीच्या जीवनात खेळाला खूप महत्व असून सर्वजण एकत्रित येत एसा प्रीमियम लीग बॉक्स क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पाडत असून सांघिकतेचे प्रदर्शन घडवले जात आहे, ज्येष्ठ सभासदांकडून युवा आर्किटेक्टस् इंजिनीअर्स यांना मोलाचे मार्गदर्शन केले जात असल्याने त्यांच्या माध्यमातून अहिल्यानगर शहराच्या सुशोभीकरणात भर पडेल, तसेच शारीरिक तंदुरुस्तीसाठी मैदानी खेळ खेळणे गरजेचे आहे, एकूण ३१ मॅचेसचा थरार पाहण्यासाठी सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा क्रिकेटर रौनक अंदानी यांनी केले.


आर्किटेक्टस् इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो. अहिल्यानगर आयोजित एसा प्रीमियम लीग बॉक्स क्रिकेट सिझन २ पॉवरड बाय एस आर जे स्टील या स्पर्धेचे उद्घाटन रौनक अंदानी यांच्या प्रमुख उपस्थितीत व एसा अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, एसा भवन कमिटी अध्यक्ष इक्बाल सय्यद आणि एस आर जे स्टील चे अविनाश पुरोहित यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष विनोद काकडे, सुनिल औटी, यश शहा, प्रदिप तांदळे, अन्वर शेख, इक्बाल सय्यद, ओमकार हळगावकर, प्रमोद भाळवणकर, विकार काझी, विजय पादिर, सचिन डागा, संजय पवार, संतोष खांडेकर आणि सभासद उपस्थित होते.या स्पर्धेसाठी आनंद सेल्स, वैष्णवी मार्बल्स अँड टाइल्स, वेंकटेश्वर आर एम सी, राघवेंद्र सप्लायर्स, पंकज स्टील, पटेल सिरॅमिक, सुमतीलाल अँड सन्स, मॉडर्न आर सी सी अँड लाइम वर्क्स, ससे ट्रेडिंग कंपनी, आनंद ट्रेडिंग कंपनी, ए टू झेड कन्स्ट्रकशन, वेंकटेश इन्फ्रा, आबेदिन पैन्ट्स, एस आर जे स्टील, आकाश सप्लायर्स आणि सम्राट इलेक्ट्रिकल अश्या अहील्यानगर मधील सोळा सप्लायर्स अथवा बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या संघांचा सहभाग आहे. स्पोर्टस कमीटी अध्यक्ष जितेश सचदेव तसेच कमिटी सभासद भूषण पांडव, अभिजीत देवी, अविनाश देवी, झोहेब खान, गौरव मांडगे, ओमकार म्हसे, प्रथमेश सोनावणे, प्रीतेश कांकरिया, संकेत पादिर हे स्पर्धा यशस्वी होण्यासाठी काम पाहत आहेत. एस आर जे कंपनीचे रोहित मानधनी, अनिरुद्ध पांडे, अविनाश पुरोहित, विशाल येसेकर आणि त्यांचे अधिकारी वर्ग यांचा एक संघ जालन्यातून या स्पर्धेत सहभाग घेण्यास आला आहे.

या उद्घाटन प्रसंगी संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी संस्था प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात ही स्पर्धा आयोजित करत असल्याचे सांगून साई टर्फ, भोसले आखाडा येथे तीन दिवस चालणारे सामने पाहण्यास जास्तीत जास्त सभासदांनी हे सामने पाहण्यास येण्याचे आवाहन केले.

स्पोर्ट्स कमिटी हेड जितेश सचदेव यांनी एसा भवन बांधकाम निधी जमा करण्याच्या उपक्रमातील हा पहिला इव्हेंट असून अहील्यानगर मधील ट्रेडर्स, सप्लायर, डीलर्स, बांधकाम क्षेत्रातील इतर घटक व संस्था सभासद यांच्यातील संबंध यानिमित्ताने दृढ होण्यास फायदेशीर होणार असल्याचे सांगितले.

एस आर जे स्टीलचे अविनाश पुरोहित यांनी आम्हाला या स्पर्धेचे मुख्य प्रायोजकत्व दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानून हा उपक्रम प्रशंसनीय असल्याचे नमुद करून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी सदफ पटेलची निवड



नगर – नुकतेच पुणे येथे ७ ते १० नाव्हेबर दरम्यान ३४ वी राज्यस्तर स्केटिंग रोलर हॉकी व इनलाईन हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत टिम स्पीड स्केटिंग ॲकॅडमीची खेळाडू सदफ पटेल ही सहभागी झाली होती. स्पर्धे दरम्यान निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. यात अनेक उत्कृष्ठ राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. यावेळी रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ऑबझर्वर हरसिमरण सिंग उपस्थित होते.

रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया या एकमेव मान्यता प्राप्त संघटनेच्यावतीने ४ ते १५ डिसेंबर दरम्यान कोईमतुर, तमिळनाडू येथे राष्ट्रीय स्पर्धा होत आहेत. सदर स्पर्धेत महाराष्ट्र संघात सदफ फातीमा महंमद शकील पटेलची निवड झाली आहे. सदफ पटेल गत पाच वर्षापासुन मनपा विभागीय कार्यालय बुरुडगाव रोड येथे टिम स्पीड स्केटिंग ॲकॅडमी येथे अद्ययावत प्रशिक्षण घेत असुन राष्ट्रीय खेळाडु सतिष गायकवाड यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभत आहे. कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूल इयत्ता आठवीची विद्यार्थीनी असून यापूर्वी तिने अनेक स्पर्धांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

सदफ पटेल आर्मीमध्ये कार्यरत असलेले शकील पटेल यांची मुलगी आहे. सदफच्या निवडीबद्दल माजी उपमहापौर गणेश भोसले, जिल्हा संघटनेचे सचिव असिफ बाबुलाल शेख व संघटनेच्या वतीने पुढिल स्पर्धेस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



जय आनंद महावीर युवक मंडळ व स्व.सुरेश मुनोत फौंडेशनच्यावतीने नवीपेठ येथील बाई ईचरजबाई फिरोदिया प्रशालेत रक्तदान शिबीर घेण्यात आले.

# रक्तदानातून असेच मानवतेचे नाते तयार होण्यास मदत

## आशाताई मुनोत यांचे प्रतिपादन; स्व.सुरेश मुनोत स्मृतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांनी कायम मानवतेची शिकवण दिली. रक्तदानातून असेच मानवतेचे नाते तयार होण्यास मदत होते. आपण केलेले रक्तदान अनेकांना जीवनदान देणारे असते. इतके मोठे भाग्य लाभणे ही रक्तदात्यांवर परमेश्वराचीच कृपा असते. अत्यवस्थ रूग्ण, रक्तासंबंधी आजार असलेले रूग्ण, अपघातग्रस्तांसाठी एखाद्याने केलेले रक्तदान महत्वाचे असते. गेल्या १२ वर्षांपासून स्व.सुरेश मुनोत यांच्या स्मरणार्थ अखंडपणे राबविण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिराच्या उपक्रमामुळे मोठी चळवळ उभी राहिली आहे, असे प्रतिपादन श्रीमती आशाताई मुनोत यांनी केले.

जय आनंद महावीर युवक मंडळ व स्व.सुरेश मुनोत फौंडेशनच्यावतीने रविवारी नवीपेठ येथील बाई ईचरजबाई फिरोदिया प्रशालेत रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन श्रीमती आशाताई मुनोत यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी कमलबाई मुनोत, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे अध्यक्ष संतोष गांधी, जैन कॉन्फरन्सचे अशोक (बाबूशेठ) बोरा, अजित बोरा, पांजरापोळ गोरक्षण संस्थेचे उपाध्यक्ष सतिश डुंगरवाल, जय आनंद महावीर युवक मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, रोनक मुनोत, राज मुनोत, रितिक मुनोत, श्रीकांत मुनोत, मनोज मुनोत, पंकज मुनोत आदींसह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य तसेच रक्तदाते उपस्थित होते.

आनंद मुथा म्हणाले, दिवाळीच्या सुट्या, निवडणुका अशा विविध कारणांमुळे सध्या रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे अतिशय योग्य वेळी सदर शिबीर होत आहे. मंडळाने एक तपापासून रक्तदान शिबिराची ही परंपरा कायम राखली आहे. स्व.सुरेश मुनोत यांच्या स्मृती जपतानाच एका सामाजिक कार्यात योगदान दिल्याचे समाधान लाभते. दरवर्षी रक्तदात्यांचा प्रतिसाद वाढतच असून मंडळाचे सदस्य इतर वेळीही रक्तदानाचे पवित्र कार्य करत असतात. विशेष म्हणजे या शिबिरामध्ये महिलाही उत्स्फूर्तपणे रक्तदानास पुढे येत असतात.

या शिबिरात आनंदऋषीजी ब्लड बँक, अहमदनगर ब्लड बँक, जनकल्याण रक्तपेढीच्या टिमने रक्त संकलनाचे काम पाहिले. शिबिरात दिवसभरात ९४ रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या. शेवटी राज मुनोत यांनी आभार मानले.

# तिळवण तेली समाज ट्रस्टच्या अध्यक्षपदी सौ. निता लोखंडे

## उपाध्यक्षपदी सौ. शोभना धारक तर सचिवपदी शशिकांत देवकर



नगर – अहिल्यानगर येथील तिळवण तेली समाज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच सभा झाली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन ट्रस्टच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी ट्रस्टच्या अध्यक्षपदी सौ. निता लोखंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी सौ. शोभना धारक तर सचिवपदी शशिकांत देवकर यांची निवड करण्यात आली.

अध्यक्षा सौ. निता लोखंडे म्हणाल्या, ट्रस्टच्या माध्यमातून समाजोन्नतीचे काम केले जात आहे. विविध उपक्रमातून समाजातील प्रत्येक घटकांचा विकास करण्यास प्राधान्य दिले आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, महिलांना उद्योग–व्यवसायासाठी मार्गदर्शन व मदत, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, गुणवंतांना प्रोत्साहन देण्यासारखे उपक्रम ट्रस्टच्या माध्यमातून राबविले जात आहे. आर्थिक दुर्बल घटकांसाठी मदतीचा हात देऊन त्यांच्या गरजा पूर्ण केल्या जात आहे. यामध्ये ट्रस्टच्या पदाधिकारी व सदस्यांचे मोठे सहकार्य लाभत आहे. ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी आपणावर अध्यक्षपदाची जी जबाबदारी टाकण्यात आली ती सर्वांना बरोबर घेऊन पार पाडू. पुढील वर्षभरात विविध उपक्रम राबविण्यास प्राधान्य राहिल असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी सौ. शोभना धारक म्हणाल्या कि ट्रस्टच्या कार्यात सर्वांचे मिळत असलेल्या सहकार्याने विविध उपक्रमांची व्याप्ती वाढत आहे. ट्रस्टच्या सभासदांच्या उन्नत्तीसाठी सर्वोतेप्रयत्न केले जात आहे. आम्ही नूतन पदाधिकारी ट्रस्टच्या लौकिकात भर घालण्याचे काम करु, असे सांगितले.

याप्रसंगी शशिकांत देवकर म्हणाले, तिळवण तेली समाज ट्रस्टचे काम आमच्या सर्वांच्या सहकार्याने व्यवस्थित सुरु असून आगामी काळात काही नवंनवीन उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे सांगितले.

यावेळी ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रसाद शिंदे म्हणाले कि राज्यात सर्वच क्षेत्रात महिला आपले काम अगदी व्यवस्थित पार पाडतात आणि म्हणूनच आम्ही सर्वानी मिळून आमच्या अध्यक्षा व उपाध्यक्षापदी महिलांची निवड करून समाजामध्ये वेगळा संदेश दिला असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, सागर काळे, गोकूळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, मनोज क्षीरसागर आदि उपस्थित होते. यावेळी प्रसाद शिंदे यांनी ट्रस्टच्या कार्याचा आढावा घेतला. सागर काळे यांनी आभार मानले.



खेलो मास्टर्स राज्यस्तरीय टेबल टेनिस चॅम्पियन्स स्पर्धेत किरण पवार यांनी सुवर्णपदक पटकाविले.

# ‘खेलो मास्टर्स राज्यस्तरीय टेबल टेनिस चॅम्पियन्स’मध्ये अहिल्यानगर येथील किरण पवार यांना सुवर्णपदक

नगर – ३० नोव्हेंबर व १ डिसेंबरला नाशिक येथे पार पडलेल्या खेलो मास्टर्स राज्यस्तरीय टेबल टेनिस चॅम्पियन्स स्पर्धेत किरण पवार यांनी सुवर्णपदक पटकाविले. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धे साठी त्यांची निवड झाली आहे.

या स्पर्धेत मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, पालघर, डहाणू इ. ठिकाणच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. राज्यस्तरीय खेलो मास्टर्स चॅम्पियन्स टेबल टेनिस स्पर्धेत तिसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावले आहे. त्यांनी आपल्या खेळात फोरहॅन्ड टॉपस्पिन, बॅकहँड, तसेच योग्य सर्विसेसचा वापर केला. किरण पवार हे स्वतः एन. आय. एस. टेबल टेनिस मार्गदर्शक राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते क्रीडा व योगशिक्षक आहेत. त्यांच्या या यशाबद्दल किरण पवार टेबल टेनिस अॅकॅडमीच्या सर्व सभासदांनी त्यांचे अभिनंदन केले.

# क्रीडा संकुलांसाठी ४५ कोटी निधीची मागणी

## मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांना खासदार नीलेश लंके यांचे पत्र

नगर – नगर शहरातील वाडिया पार्क साठी वीस कोटी तर पारनेर, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड व शेवगांव या तालुक्यांतील क्रीडा संकुलांसाठी प्रत्येकी पाच कोटींच्या निधीची मागणी खा. लंके यांनी केली असून हा निधीही मार्च महिन्यात मंजुर करण्याची ग्वाही केंद्रीय श्रम, रोजगार, युवा कार्यक्रम तथा खेळ मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.



वाडियापार्कसह विविध तालुक्यांतील क्रीडा संकुलांसाठी ४५ कोटी रूपयांचा निधी देण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्याकडे केली.

नगर शहरातील वाडिया पार्क तसेच विविध तालुक्यांतील क्रिडा संकुल किंवा त्यात सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खा. लंके यांनी नवी दिल्ली येथे खा. भास्कर भगरे यांच्यासह मंत्री मांडविया यांची भेट घेतली. यासंदर्भात लंके यांनी मांडविया यांना दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर शहरातील वाडिया पार्क हे जिल्हयातील एकमेव प्रमुख क्रीडा संकुल आहे. या संकुलामध्ये अनेक सुविधांची आवष्यकता असून काही सुविधांअभावी विस्तृत आणि मोठे क्षेत्रफळ असूनही या संकुलापासून खेळाडू उपेक्षित राहत आहेत. वाडिया पार्क विकसीत करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास एक गुणवत्तापुर्ण क्रीडा संकुल उभे राहील. त्या माध्यमातून विविध खेळांना प्रोत्साहन मिळू शकेल असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला आहे.

नगर शहराबरोबरच पारनेर,श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगांव या तालुक्यांमधील क्रीडा संकुलांमध्येही विविध सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे क्रीडा संकुल असूनही ग्रामीण भागातील खेळाडूंना त्याचा लाभ घेता येत नाही. मंत्री मांडविया यांनी या मागणीचा विचार करून निधी मंजुर करण्याची मागणी खा. लंके यांनी यावेळी केली.

खा. लंके यांच्या मागणीचा विचार करून येत्या मार्च महिन्यात ४५ कोटींच्या निधीला मंजुरी देण्याची ग्वाही मंत्री मांडविया यांनी दिल्याचे खा. लंके यांनी सांगितले.



न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) अ.नगर येथे ’आविष्कार २०२४ विभागीय संशोधन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयात आविष्कार विभागीय संशोधन स्पर्धा उत्साहात

नगर – न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) अ.नगर येथे ’आविष्कार २०२४ विभागीय संशोधन स्पर्धा झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २००६ पासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संशोधन वृतीला चालना देण्यासाठी आविष्कार, अन्वेषण, इनोव्हेशन, परिषदा यासारखे उपक्रम राबविले जातात. याद्वारे विद्यार्थ्यांमधून उद्योजक व संशोधक निर्माण करण्याच्या दृष्टीने तसेच सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठातील सायन्स आणि इनोव्हेशन पार्क, इन्कुबेशन सेंटर व एस्पायर यासारख्या संशोधन प्रोत्साहन योजनांशी जोडणे शक्य होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आविष्कार विभागीय स्पर्धेकरीता अ.नगर जिल्ह्यातील विविध २४ महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थ्यांचे सुमारे १७० प्रकल्प सादरीकरणासाठी २८० विद्यार्थी न्यू आर्टस् महाविद्यालयात पाठविले. महाविद्यालयाने त्याकरिता उत्कृष्ट नियोजन करून आविष्कार स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधक वृतीला, नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांना चालना दिली हि खूप गौरवाची व अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. यामधून ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांना आपले संशोधन विचार मांडण्याची सुवर्णसंधी मिळाली.

परीक्षक म्हणून ॲग्रिकल्चर व ॲनिमल हजबंडरी या कॅटेगरीसाठी सोनई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर लावरे, मानद वन्यजीव संरक्षक प्रो. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, फार्मसी व मेडिसिन कॅटेगरीसाठी विखे पाटील महाविद्यालयाचे प्रो. डॉ. रमेश सावंत, सोनई महाविद्यालयाचे प्रो. डॉ. रामदास पांढरे, इंजिनीअरिंग व टेक्नॉलजी कॅटेगरीसाठी छत्रपती शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रो. डॉ. ए. बी. काळे, विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पी. आर. एस. तांबे यांनी काम पहिले. याप्रसंगी वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, कला विभागाचे समन्वयक प्रो. डॉ. किसन अंबाडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वय डॉ. अनंता हरकळ, समन्वयक डॉ. आनंद पंडित, विविध विभागांचे विभागप्रमुख, सहकारी प्राध्यापक, प्रबंधक, अधीक्षक आणि अनेक संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक, समिती सदस्य, प्रशासकीय कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# ‘‘इंडियन रेकॉर्डिंग आर्टस् अॅकॅडमी’ पुरस्काराने अहिल्यानगर येथील प्रसन्न हनुवटे सन्मानित



नगर – अहमदनगर फिल्म फाऊंडेशनचे संस्थापक सदस्य प्रसन्न हनुवटे यांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेचा मानला जाणारा ‘‘इंडियन रेकॉर्डिंग आर्टस् अॅकॅडमी’ (IRAA) पुरस्कार पटकावला आहे. तेलुगू वेबसीरिज Hostel Days साठी बेस्ट डायलॉग एडिटर या विभागात मिळालेल्या या पुरस्कारामुळे अहमदनगरचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्वल झाले आहे.

प्रसन्न हनुवटे हे अहमदनगरमधील साऊंड डिझायनर आहेत, ज्यांना हा सन्मान मिळाला आहे. मागील १५ वर्षांपासून ते मुंबईत चित्रपट साऊंड डिझाईन आणि डबिंग क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या कामगिरीचा प्रवास हा प्रेरणादायी आहे. त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक नामांकित चित्रपटांवर काम केले आहे, ज्यामध्ये भूतनाथ रिटर्न्स, रोकेट्री, दुकान, हमशकल्स, धावक, आणि कंट्री ऑफ ब्लाइंड यांचा समावेश आहे. या चित्रपटांमध्ये त्यांनी डायलॉग एडिटर आणि डिझायनर म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

प्रसन्न यांचे शालेय शिक्षण अहमदनगरमध्ये झाले असून, त्यांचे वास्तव्य पाईपलाइन रोड, अहमदनगर येथे आहे. ते नेहमीच आपल्या शहराशी आणि आपल्या मुळांशी जोडलेले आहेत. त्यांचा प्रवास हा केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर अहमदनगरमधील नवोदित कलाकारांसाठी एक प्रेरणा आहे.

अहमदनगर फिल्म फाऊंडेशनच्या वतीने प्रसन्न हनुवटे यांच्या यशस्वी कामगिरीचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी फाऊंडेशनचे सदस्य सारंग देशपांडे, विराज मुनोत, संजय धोत्रे आणि प्रशांत जठार उपस्थित होते. त्यांनी प्रसन्न हनुवटे यांचे अभिनंदन करताना त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

प्रसन्न हनुवटे यांनी घेतलेले हे यश नगरच्या सांस्कृतिक आणि कलात्मक परंपरेला नवा आयाम देणारे ठरले आहे. त्यांच्या कार्यामुळे नवोदित साऊंड इंजिनियर्स आणि चित्रपट क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांना प्रेरणा मिळेल. अहमदनगर शहराने त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा आदर व्यक्त करताना त्यांच्यासाठी अभिमान व्यक्त केला आहे.




राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत नगरच्या आशिष चौधरी यास ब्राँझ पदक प्रदान करण्यात आले.

# राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत नगरच्या आशिष चौधरी यास ब्राँझ पदक



नगर – नुकत्याच कलकत्ता (पश्चिम बंगाल) येथे आयोजित केलेल्या शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत १९ वर्ष वयोगटमधे महाराष्ट्र संघाने उत्कृष्ठ कामगिरी करत ब्राँझ पदक पटकाविले. यात नगरच्या आशिष चौधरी याने महाराष्ट्र संघाकडून खेळत देशात संघाला तिसरा क्रमांक मिळवून देत ब्राँझ पदक मिळवत कौतुकास्पद कामगिरी केली.

आशिष यास बुद्धिबळ प्रशिक्षक प्रकाश गुजराथी सर आणि विशाल गुजराथी सर यांचे मार्गदर्शन मिळाले.

या यशाबद्दल जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व सचिव यशवंत बापट तसेच पेमराज सारडा महाविद्यालयाचे प्राचार्य व क्रिडा प्रशिक्षक यांनी त्याचे अभिनंदन केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढला पाहिजे

## शिक्षणाधिकारी बाळासाहेब घुगे यांचे प्रतिपादन; भाग्योदय विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

नगर – भाग्योदय विद्यालय मध्ये विज्ञान प्रदर्शन आयोजन केले ही खूप गरजेची गोष्ट आहे. कारण विद्यार्थी अवस्थेमध्ये शालेय अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना अभ्यास पूरक आणि कृतीयुक्त कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होता यावे यासाठी विज्ञान प्रदर्शन खूप महत्त्वाचे आहे. हेच खरे जीवन शिक्षण आहे. या विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांचे सुप्त गुण, कला यांना वाव मिळतो. विज्ञान प्रदर्शनातून आपल्याला विद्यार्थ्यांमध्ये लपलेले डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम, एडिसन न्यूटन यासारखे महान शास्त्रज्ञ पहावयास मिळतात. विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागतो. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती व सुजनशिलतेचा विकास होतो. वैज्ञानिक प्रयोगाचा वापर मानवाच्या जीवनामध्ये झाला पाहिजे. समाजाच्या समस्या सोडवण्याकरता झाला पाहिजे. समाजामध्ये निर्माण होणारे ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण, वायू प्रदूषण, यासारखे प्रदूषण कमी करण्याकरता विज्ञानातील प्रयोगाचा वापर झाला पाहिजे, असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी बाळासाहेब घुगे यांनी केले.



भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक रमेश फिरोदिया, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद निरंतर विभाग बाळासाहेब घुगे, शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक रघुनाथराव लोंढे, ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य जगदंबा विद्यालयाचे मुख्याध्यापक जयसिंग दरेकर, भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य ज्ञानदेव सर यांनी केले. प्रस्ताविकात त्यांनी शाळेत वर्षभर विविध सहशालेय उपक्रम राबविण्यात येतात, त्याचाच एक भाग म्हणून यंदाही विद्यालयांमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. जवळजवळ अडीचशे उपकरण विद्यार्थ्यांनी बनवलेले आहेत. आपण आज सर्वजण विज्ञानाच्या युगामध्ये वावरत आहोत जैवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात खूप बदल झाले आहेत. मोठ्या प्रमाणात संशोधन झालेले आहे. एवढेच नाही तर मेडिकल आरोग्य उत्पादन क्षेत्र याबरोबरच विज्ञान आणि संपूर्ण जग आणि जीवन व्यापलेले या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वतः उपकरणे बनवलेले आहेत. हा अविस्मरणीय अनुभव विद्यार्थी आयुष्यभर विसरणार नाहीत. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक व संशोधक संशोधन वृत्ती जागी व्हावी, या हेतूने या विज्ञान प्रदर्शनाचे भाग्योदय विद्यालयात आयोजन करण्यात आलेले आहे.

भैरवनाथ शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक रघुनाथराव लोंढे यांनी सांगितले की, आज मानवाचे संपूर्ण जीवन विज्ञानावर आधारलेले आहे. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी खूप मोठ्या भूप्रमाणात विज्ञान प्रदर्शनात सहभागी होऊन सहभागी होऊन आपला स्वतःचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवला पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय पांडुळे यांनी केले. तर आभार गोरक्षनाथ कांडेकर यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक कोतकर बाबासाहेब, साहेबराव कारले, सोपानराव तोडमल, धनंजय बारगळ, संतोष काकडे, आदिनाथ दुबे, गोविंद कदम, एकनाथ होले तसेच श्रीमती रूपाली शिंदे, रेणुका गुंड व शिक्षकेतर कर्मचारी गणेश गायकवाड, सुधाकर गायकवाड, बाळासाहेब कावरे आदींनी परिश्रम घेतले.

# अर्थजगत

आर्थिक व्यवहारांसाठी प्रमुख ओळखपत्र म्हणून पॅन कार्ड या दस्तावेजाला अत्यंत महत्त्व आहे. आयकर कलम १३९ ए अंतर्गत १९७२ साली पॅनकार्ड जारी करण्यात आले होते. सुरुवातीला करदाते आणि आयकर विभागाशी संबंधित लोकांसाठी जारी करण्यात आलेले पॅनकार्ड १९९०च्या दशकात सर्व व्यक्ती आणि कंपन्यांसाठी अनिवार्य करण्यात आले. मध्यंतरीच्या काळात आयकर विभागाने मोबाईल आणि पॅनकार्ड लिंक करण्याची योजना आणल्यानंतर पॅनकार्डची उपयुक्तता अधिक वाढली. आता केंद्र सरकारने पॅन अपग्रेडेशन प्रोग्राम सुरू केला असून याला पॅन कार्ड २.० असे नाव देण्यात आले आहे. या प्रकल्पाला प्राप्तिकर विभागाने हिरवा कंदील दाखवला आहे.

## पॅनकार्डची नवी योजना काय आहे?

पॅनकार्डची इको सिस्टीम सुधारण्यासाठी हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. ही सुविधा फायेशीर असली तरी त्याबाबत अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः जुन्या पॅनकार्डचे काय होणार, पॅन क्रमांक बदलणार का आणि यासाठी शुल्क आकारणी केली जाणार का हे तीन प्रमुख प्रश्न सर्वच पॅनकार्डधारकांना पडले आहेत. पण त्याची उत्तरे शासनाने दिलेली आहेत.

त्यानुसार

१. पॅनकार्ड २.० मध्ये कोणाही व्यक्तीचा पॅन क्रमांक बदलणार नाही.

२. हे अपग्रेडेशन पूर्णतः निःशुल्क आहे.

३. जुने झरप पॅनकार्ड अपग्रेड करुन युजर्सना नवीन तंत्रज्ञानासह पॅन दिले




जाईल. यासाठी जुन्या पॅनकार्ड धारकांना कोणताही नवीन अर्ज करण्याची गरज नाही. तसेच कसलीही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार नाहीये. सरकारकडून तुमचे पॅनकार्ड अपग्रेड करण्यात येणार आहे.

● पॅनकार्ड २.०चे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये एक क्यूआर कोड देण्यात येणार आहेत. तो स्कॅन केल्यानंतर युजरची संपूर्ण माहिती सहज मिळू शकते.

**फायदे काय?**

● क्युआर कोड आधारीत नवीन पॅनकार्डमुळे आयकर विवरणपत्र (आयटीआर रिटर्न) भरणे आणि अन्य आर्थिक व्यवहार जलद होतील.

● सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बनावट पॅनकार्ड आणि फसवणुकीला आळा बसेल.

● नवीन पॅनकार्ड हे उद्याच्या भविष्यात सर्व प्रकारच्या वित्तीय सेवांसाठी युनिव्हर्सल आयडीचे काम करेल.

● या उपक्रमामागे, करसंकलनात पारदर्शकता आणणे आणि करचुकवेगिरीला लगाम घालणे हे दोन उद्देश आहेत.

● ही यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी सरकार १,४३५ कोटी रुपये खर्च करणार आहे. डिजिटल इंडियाचा एक भाग म्हणून त्याचे वर्णन करण्यात आले आहे.

● इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की,

**■ माहीत आहे?**

जुन्या पॅनकार्डमध्ये सुरक्षा त्रुटी होत्या, त्यामुळे फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. एका व्यक्तीच्या पॅनकार्डवरून ओळख चोरीचे प्रमाणही वाढू लागले होते.

● सध्या पॅनकार्ड ऑपरेट करण्यासाठी वापरण्यात येणारे सॉफ्टवेअर १५ ते २० वर्षे जुने आहे. या सॉफ्टवेअर्समुळे अनेक वेळा समस्या निर्माण होतात. त्यामुळे नवीन पॅनकार्डमध्ये ही प्रणाली डिजिटल पद्धतीने तयार केली जाणार आहे.

◆◆◆

युनायटेड पेमेंट्स इंटरफेस अर्थात युपीआयमुळे सामान्य लोकांचे जीवन सोपे झाले आहे. कोविड महामारीनंतर युपीआयद्वारे व्यवहारांची संख्या लक्षणीय वाढली आहे; परंतु फसवणुकीची व्याप्तीही वाढली आहे. वित्त मंत्रालयाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत म्हणजेच सप्टेंबरपर्यंत युपीआयद्वारे फसवणुकीच्या ६.३२ लाख घटना नोंदवण्यात आल्या असून यामध्ये लोकांची ४८५ कोटी रुपयांची फसवणूक झाली.

## युपीआयद्वारे फसवणूक वाढतेय

## काय काळजी घ्याल?




कशी होते फसवणूक?

● **फिशिंग लिंक्स:** फसवणूक करणारे ठकसेन एसएमएस, ईमेल किंवा इतर माध्यमातून स्पॅम लिंक पाठवतात. या लिंक्समध्ये एकतर मालवेअर असते, ज्याद्वारे बँकेशी संबंधित गोपनीय माहिती चोरतात किंवा याद्वारे वापरकर्त्याचा युपीआय पिन जाणून घेतला जातो. यानंतर, त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या खात्यातून खरेदी केली जाते किंवा पैसे इतरत्र पाठवले जातात.

● **क्यूआर कोडद्वारे फसवणूक :** अलीकडील काळात क्यूआर कोडद्वारे फसवणूक होण्याच्या घटनांमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. वापरकर्ते काहीतरी वेगळा विचार करून क्यूआर कोड स्कॅन करतात, पण त्यांची इच्छा पूर्ण होण्याऐवजी खात्यातून पैसे लंपास केले जातात. क्यूआर कोडद्वारे फसवणूक केले जाण्याचे अनेक मार्ग आहेत. फसवणूक करणारे हा कोड पाठवतात आणि तो स्कॅन केल्यास कॅशबॅक किंवा परतावा मिळेल, असे आमिष दाखवतात. परंतु स्कॅन केल्यावर, फिशिंग वेबसाइट उघडतात किंवा मालवेअर स्थापित होतात. यानंतर, फसवणूक करणारे सहजपणे वापरकर्त्याची गोपनीय माहिती मिळवतात किंवा त्यांच्या परवानगीशिवाय व्यवहार करून खाते रिकामे करतात.

● फसवणूक करणारे काही ठकसेन बरेचदा पार्किंग मीटर, डोनेशन बॉक्स इत्यादींवर खऱ्या क्यूआर कोडवर खोटे क्यूआर कोड पेस्ट करतात. कोणीतरी त्यांना स्कॅन करताच, पैसे योग्य ठिकाणी जाण्याऐवजी फसवणूक करणाऱ्याच्या खात्यात जातात. अनेक वेळा कोड स्कॅन होताच फोनवर मालवेअर इनस्टॉल होतो आणि तिथून पुढे खाते रिकामे होईपर्यंत युजरला पत्ताही लागत नाही.

● **ओटीपी चोरी:** गुरुग्राममधील ४०-५० डॉक्टरांची व्हॉट्सअॅप खाती अलीकडेच हॅकिंगची शिकार झाली. फसवणूक करणाऱ्यांनी स्वत:ची ओळख एका कंपनीचे प्रतिनिधी असल्याची करून दिली आणि दिवाळी भेटवस्तू पाठवणार असल्याचे सांगितले. हे करत असताना सदर भेटवस्तू खूप मौल्यवान असल्याने, डॉक्टरांना त्यांची ओळख ऑनलाइन सिद्ध करण्यास सांगण्यात आले. यासाठी त्यांना एक नंबर डायल करण्यास सांगण्यात आले. नंबर डायल करताच कॉल फॉरवर्डिंग सुरू झाले आणि डॉक्टरांच्या फोनवर आलेले सर्व कॉल गुन्हेगारांच्या फोनवर पाठवले जाऊ लागले. त्यानंतर या टोळीने डॉक्टरांचे व्हॉट्सअॅप अकाउंट उघडण्याचा प्रयत्न केला. लॉगिनची खात्री करण्यासाठी व्हॉट्सअॅपने ओटीपी पाठवल्यावर ते गुन्हेगारांच्या फोनवरही पोहोचले. ओटीपीच्या माध्यमातून त्यांनी डॉक्टरांची खाती उघडली आणि ती स्वतः चालवायला सुरुवात केली. त्यानंतर हे ठकसेन डॉक्टरांचे कुटुंबीय, मित्र आणि सहकाऱ्यांना व्हॉट्सअॅपवर मेसेज पाठवून पैशांची मागणी करू लागले. यामध्ये अनेकांनी पैसेही पाठवले आणि ठकसेनांची मोहीम फत्तेह झाली.

**■ जाणून घ्या**

**सुरक्षित कसे राहायचे?**

● कोणत्याही अनोळखी व्यक्ती किंवा अनोळखी स्रोताची लिंक कधीही उघडू नका. संशयास्पद लिंक्समधून आलेली अॅप्स किंवा फाइल्सही उघडू नका. तुमचे युपीआय अॅप अशा बँक खात्याशी किंवा वॉलेटशी लिंक करा ज्यामध्ये खूप कमी रक्कम शिल्लक आहे. यामुळे नुकसान झाले तरी ते खूपच कमी असेल. युपीआयद्वारे दैनंदिन व्यवहारांची मर्यादा निश्चित करा.

● सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, क्यूआर कोड पैसे पाठवण्यासाठी आहेत, पैसे मिळवण्यासाठी नाहीत हे कदापि विसरु नका.

● आजकाल, मोबी आर्मरसारखे सुरक्षा अॅप्स देखील उपलब्ध आहेत. असे अॅप्स क्यूआर कोड, लिंक्स आणि वाय-फाय नेटवर्क स्कॅन करून ते सुरक्षित आहेत की नाही हे सांगू शकतात.

● तुमचे युपीआय अॅप नियमितपणे अपडेट करत राहा जेणेकरून तुम्हाला नवीन सिक्युरिटी फीचर्स मिळत राहतील. व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी केवळ विश्वसनीय अॅप्स आणि प्लॅटफॉर्मवर युपीआय व्यवहार करा. तुम्हाला तुमच्या बँकेकडून कोणतीही संशयास्पद विनंती मिळाल्यास कस्टमर केअर नंबरवर कॉल करा आणि चौकशी करा.

◆◆◆

## अनिश्चित वातावरणातील सुरक्षित गुंतवणूकपर्याय

सध्या सुरू असलेल्या शेअर बाजारातील चढउतारांमुळे अनेक गुंतवणूकदार स्थिर गुंतवणूक साधनांकडे वळत आहेत. विशेषत: लहान बचत योजना यावेळी आकर्षक बनल्या आहेत. कारण पुढील आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात व्याजदर कपातीची शक्यता वाढली आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर आरबीआय सध्या व्याजदरात कपात करण्याच्या मनःस्थितीत नाही. सरकारने ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीसाठी एनएससीसह १२ लहान बचत योजनांवरील व्याजदरांमध्ये कोणताही बदल केलेला नाही.एनएससीवर मिळणाऱ्या व्याजानसुार आरबीआय फ्लोटिंग रेट सेव्हिंग्ज बाँडचे व्याज निर्धारित केले जाते. ज्या गुंतवणूकदारांना नियमित व्याज उत्पन्नाची गरज असते त्यांच्यासाठी हा बाँड एक चांगला पर्याय आहे.




आरबीआयने चालू सहामाहीसाठी (जुलै-डिसेंबर २०२४) या रोख्यावरील व्याज दर ८.०५ टक्के कायम ठेवला आहे. ही सलग दुसरी सहामाही आहे जेव्हा व्याजदर (कुपन रेट) स्थिर ठेवला आहे. असे असूनही, हे बाँड अनेक लहान बचत योजना आणि सरकारच्या निश्चित उत्पन्न साधनांपेक्षा अधिक आकर्षक आहेत. केवळ ज्येष्ठ नागरिक बचत योजना सध्या या बाँडपेक्षा जास्त व्याज देत आहे. या योजनेवर ८.२ टक्के व्याज आहे. यापूर्वी, आरबीआयने जुलै-डिसेंबर २०२३ या सहामाहीसाठी या रोख्यावरील व्याजदर ७.६५ टक्क्यांवरून ७० बेसिस पॉइंट्सने वाढवले होते. सरकारने एनएससीवरील व्याजदर वाढवल्यानंतर आरबीआयने या बाँडवरील व्याजदरात वाढ केली होती. हा फ्लोटिंग रेट बाँड आहे. त्यामुळे या रोख्यावरील व्याज संपूर्ण कार्यकाळात सारखेच राहत नाही. या रोख्यावरील व्याज दर सहा महिन्यांनी म्हणजे १ जुलै आणि १ जानेवारी रोजी निश्चित केले जाते. या रोख्यावरील व्याज निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र हे बेंचमार्क मानले गेले आहे. बॉण्डधारकांना फ्लोटिंग रेट सेव्हिंग्ज बाँड्स, २०२० वर संबंधित अर्ध्या वर्षांसाठी १ जुलै आणि १ जानेवारी रोजी एनएससीवर मिळणाऱ्या व्याजापेक्षा ३५ बेस पॉइंट्स अधिक व्याज मिळते.

सरकारने येत्या जानेवारी-मार्च तिमाहीसाठी नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटवरील व्याजदरात वाढ केल्यास, फ्लोटिंग रेट सेव्हिंग बॉण्डवरील व्याजही वाढणार आहे.

कोणतीही जोखीम न घेता बँक एफडीच्या तुलनेत जास्त परतावा आणि नियमित उत्पन्न लक्षात घेऊन, बहुतेक लोक सामान्यतः सरकारच्या दोन अतिशय लोकप्रिय लहान बचत योजनांची निवड करतात - ज्येष्ठ नागरिक बचत योजना आणि पोस्ट ऑफिस मासिक उत्पन्न योजना. परंतु नावाप्रमाणेच ज्येष्ठ नागरिक बचत योजनेत सिनियर सिटीझनच पैसे जमा करू शकतात. पोस्ट ऑफिस मासिक उत्पन्न योजनेत वयाचे कोणतेही बंधन नाही. पणया योजनेवरील व्याज कमी आहे आणि यामध्ये गुंतवणुकीवर मर्यादा आहे. सध्या या योजनेवर ७.४ टक्के व्याज आहे. तर एकल आणि संयुक्त खात्यासाठी, या योजनेतील गुंतवणुकीची मर्यादा अनुक्रमे ९ लाख आणि १५ लाख रुपये आहे.

**■ गुंतवणूक**

● तुम्हाला नियमित उत्पन्नासह ८ टक्क्यांपेक्षा जास्त व्याजदर हवे असतील, तर आरबीआय फ्लोटिंग रेट सेव्हिंग बाँड्स, २०२० हा एक चांगला पर्याय आहे. हे रोखे अत्यंत सुरक्षित आहेत कारण ते सरकारद्वारे जारी केले जातात.आरबीआने बहुतांश बँकांना हे बाँड जारी करण्यासाठी अधिकृत केले आहे.

● या बाँडमध्ये एक व्यक्ती, संयुक्त किंवा अल्पवयीन व्यक्तीचे पालक म्हणून वर्षभरात केव्हाही गुंतवणूक केली जाऊ शकते.यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही प्रकारे अर्ज करू शकता.

● रिटेल गुंतवणूकदार आरबीआयच्या रिटेल डायरेक्ट पोर्टलद्वारे हे बाँड खरेदी करू शकतात. तुम्ही १००० रुपयांपेक्षा कमी किमतीचे रोखे खरेदी करू शकता. यानंतर, तुम्हाला फक्त १००० रुपयांच्या पटीत गुंतवणूक करावी लागेल. यामध्ये कमाल गुंतवणुकीवर कोणतीही मर्यादा नाही.

◆◆◆

## एक कोटीचे घर घ्यायचंय?

भारतात घर खरेदी हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय मानला जातो. परंतु एखाद्या घराची किंमत एक कोटी किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर या निर्णयाला अधिकच महत्त्व येते. आपल्याकडे बहुतांश खरेदीदार गृहकर्जाच्या मदतीने



घराचे स्वप्न पूर्ण करतात. अशावेळी एक कोटी मूल्य असलेल्या घराची, फ्लॅटची खरेदी करताना आपल्याला किती वेतन असावे, हे पाहणे देखील महत्त्वाचे आहे. परंतु गृहकर्जासाठी किती वेतन असायला हवे याचे आकलन करायला हवे. हप्ता किती आणि अन्य खर्च देखील पाहिले पाहिजे.

पती पत्नी नोकरदार असतील तर एक कोटींचे घर घेणे सहज शक्य आहे. मात्र एकावरच घराची जबाबदारी असेल तर आर्थिक नियोजन करावे लागेल.कमी वयात घर खरेदी करणे हे नेहमीच फायद्याचे राहते. म्हणून उत्पन्न चांगले असेल तर तातडीने घर घेण्याबाबत आग्रही राहणे कधीही उत्तम.

**■ अर्थगणित**

**एक कोटी घराचे गणीत समजून घ्या**

● **गृहकर्जाची रक्कम:** बँकांकडून ८० टक्क्यांपर्यंत कर्ज दिले जाते. म्हणजे एक कोटींचे घर घरेदी करण्यासाठी ८० लाखांचे कर्ज मिळेल.

● **डाऊन पेमेंट:** वीस टक्के रक्कम. ही रक्कम तुम्हाला स्वत:ला भरावी लागेल. म्हणजे २० लाख रुपये.

● **कर्जाचा कालावधी:** जर तुम्ही २१ ते ३० वर्षे वयोगटातील असाल तर ३० वर्षे मुदतीसाठीचे कर्ज मिळू शकते.

● **व्याजदर:** सरासरी ८.५ टक्के

● **हप्त्याचे प्रमाण:** आपला मासिक हप्ता हा आपल्या वेतनाच्या ४० ते ५० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये, असा गुंतवणूक व अर्थनियोजनशास्त्राचा अलिखित नियम आहे.

● **हप्त्याचे गणीत**

**८० लाखांच्या कर्जावर किती हप्ता?**

● व्याजदर: ८.५ टक्के/१२ = ०.००७०८३

● कर्जाचा कालावधी: ३६० महिने

● यानुसार हप्ता सुमारे ६१ हजार ५०० होईल.

● **किती वेतन हवे?**

बँकेच्या मते कर्जाचा हप्ता हा वेतनाच्या ४० ते ५० टक्के पर्यंत असावा. आपल्याला ६१ हजार हप्ता असेल आणि ती रक्कम आपल्या वेतनाच्या ४० टक्के असेल तर आपल्याला मासिक वेतन एक लाख ५३ हजार ७५० रुपये असणे गरजेचे आहे. म्हणजे वार्षिक पॅकेज १८ लाख ४५ हजार असणे अपेक्षित आहे. घर घरेदी करण्यासाठी नोंदणीची रक्कम वेगळी असते आणि यात गृहित धरलेली नाही.

## जीडीपी घसरणीने बाजारावर दबाव?


भारतीय शेअर बाजारासाठी मागील दोन आठवडे हे आशादायक ठरले आहेत. या दोन सप्ताहांमध्ये जवळपास २.६ टक्क्यांची वाढ बाजाराने नोंदवलेली असून त्याआधीच्या काळातील घसरणीचे आणि पडझडीचे ढग पाहता ही वाढ निश्चितच महत्त्वाची ठरणारी आहे. साप्ताहिक आधारावर विचार करता बहुतांश निर्देशांकांमध्ये गतसप्ताहात वृद्धी दिसून आली आहे. मिडकॅप इंडेक्स २ टक्क्यांनी वधारला आहे; तर निफ्टीमध्ये १ टक्क्यांची वाढ झाली आहे. सर्वाधिक वाढ पीएसू बँक इंडेक्समध्ये दिसून आली आहे. एसबीआय, एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँक यांच्या नेतृत्वाखाली निफ्टी बँकमध्ये गतसप्ताहात जवळपास २ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी गतसप्ताहाच्या सुरुवातीला खरेदीचा कौल दर्शवला होता. परंतु गुरुवार आणि शुक्रवारी जवळपास १५००० कोटी रुपयांच्या समभागांची विक्री करुन आठवड्याची कसर भरून काढली. साप्ताहिक आकडेवारी पाहिल्यास एफआयआयनी ५०२६.७७ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली आहे; तर डीआआयकडून ६९२४.७८ कोटींच्या समभागांची खरेदी करण्यात आली आहे. नोव्हेंबर महिन्यात एफआयआयनी ४५,९७४ कोटींच्या समभागांची विक्री केली आहे.

जागतिक बाजारातील कमकुवत संकेत, अमेरिकी फेडरल रिझर्व्हच्या धोरणासंबंधी चिंता आणि व्यापक प्रमाणावर झालेल्या नफावसुली यांमुळे प्रमुख निर्देशांकांवर गेल्या आठवड्यात घसरणीचा दबाव दिसत होता. परंतु देशांतर्गत गुंतवणूकदारांच्या खरेदीमुळे बाजार सावरला. गतसप्ताहात सेन्सेक्समध्ये ०.८६ टक्के म्हणजे ६८५.८८ अंकांची वाढ झाली आणि हा निर्देशांक ७९,८०२.७९ वर बंद झाला; तर निफ्टी ५० निर्देशांकात २२३.८५ अंकांची वाढ झाली आणि तो २४,१३१.१० वर बंद झाला. अर्थात, नोव्हेंबर महिन्याचा विचार करता सेन्सेक्समध्ये ०.५ टक्क्यांची वाढ दिसून आली, तर निफ्टीमध्य ०.३० टक्क्यांची घसरण दिसून आली आहे.

या पार्श्वभूमीवर चालू आठवड्याचा विचार करता काही घटनांचे बाजारावर पडसाद उमटताना निश्चितपणाने दिसून येतात. यापैकी सर्वांत पहिली घटना म्हणजे २९ नोव्हेंबरच्या सायंकाळी आलेले भारताचे जीडीपीचे आकडे. या आकडेवारने दुसऱ्या तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर अंदाजापेक्षा अधिक प्रमाणात घसरल्याचे दिसून आले आहे. मागील तिमाहीमध्ये जीडीपी दर ६.७ टक्के होता. तो या तिमाहीत घसरून ५.४ टक्क्यांवर आला आहे. गेल्या २१ महिन्यातील हा सर्वांत नीचांकी दर आहे.

**■ वेध बाजाराचा**

खाणउद्योगाने उणे वाढ दर्शवली आहे; तर उत्पादन क्षेत्रातही 'स्लोडाऊन'च्या छाया दिसत आहेत. या आकडेवारीबाबत सरकारचे असे म्हणणे आहे की, आकडे निश्चितच निराशाजनक आहेत; पण आर्थिक विकासाबाबत घाबरण्याचे कारण नाही. येत्या काळात आकडेवारीत सुधारणा दिसून येतील. याखेरीज २ डिसेंबर रोजी जाहीर होणाऱ्या वाहनविक्रीच्या आकड्यांचेही पडसाद बाजारात उमटतील. ऑक्टोबर महिन्यामध्ये विक्रीत फारशी वाढ न दिसून आलेल्या वाहनउद्योगाकडून नोव्हेंबरमधील विक्रीचे आकडे आशादायक असतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात



आहे. यादरम्यान नोमुराने एक अहवाल जारी केला आहे. त्यानुसार सवलती आणि मागणीतील घसरणीचा परिणाम चारचाकींच्या विक्रीवर दिसून येऊ शकतो. तथापि, दुचाकींची घाऊक विक्री वार्षिक आधारावर ३ टक्क्यांपर्यंत वाढलेली दिसू शकते. तसेच ग्रामीण भागात पर्जन्यमानामुळे सुधारलेल्या परिस्थितीचा परिणाम ट्रॅक्टरच्या मागणीवृद्धीतून दिसू शकतो.

चार डिसेंबरपासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पतधोरण समितीची बैठक सुरू होत आहे. आरबीआयने गेल्या १० बैठकांमध्ये रेपो दर ६.५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. ६ डिसेंबर रोजी जाहीर होणाऱ्या पतधोरणामध्ये रेपोदरात कपात व्हावी अशी उद्योगजगतासह सरकारचीही अपेक्षा आहे. ऑक्टोबर महिन्यातील पतधोरण जाहीर करताना केंद्रीय मध्यवर्ती बँकेने आपला दृष्टिकोन बदलल्याचे संकेत दिले होते. पण चलनवाढीच्या आव्हानामुळे आरबीआय व्याजदर कपात करणार का याबाबत साशंकता आहे. बाजाराची काटेकोर नजर या पतधोरणावर आहे. ६ डिसेंबर रोजी जाहीर होणाऱ्या अमेरिकेतील बेरोजगारीच्या आकड्यांकडेही जागतिक बाजारांचे लक्ष असणार आहे.

याखेरीज केंद्र सरकारची खर्चाची आकडेवारी तसेच रविवारी जाहीर होणारे जीएसटी संकलनाचे आकडेही बाजारासाठी महत्त्वाचे राहतील. ऑक्टोबर महिन्यात जीएसटी कलेक्शन १.८७ लाख कोटींहून अधिक राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कॅनफिन होम्स, विप्रो यांसह काही कंपन्यांच्या लाभांशाची एक्स- डिव्हिडंड डेट चालू आठवड्यात आहे. त्यामुळे या समभागांमध्येही हालचाल दिसून येऊ शकते.

टेक्निकल चार्ट पाहिल्यास २४३५० च्या पातळीवर निफ्टीसाठी अडथळा पातळी आहे; तर २३९२५ च्या पातळीवर तात्काळ आधार आहे. याखाली घसरल्यास २३७५० पर्यंतची घसरण दिसू शकते. सध्या सर्व आर्थिक विश्लेषकांकडून घसरलेल्या जीडीपीबाबत चिंता व्यक्त होत आहे. त्यामुळे याचे पडसाद बाजारात दिसण्याची दाट शक्यता आहे. सबब गुंतवणूकदारांनी आणि ट्रेडर्सनी बाजाराचा कल पाहून रणनीती ठरवणे आवश्यक आहे. पण सध्या सेल ऑन राईज ही रणनीती प्रभावी ठरेल असे दिसते. अल्पकालीन गुंतवणुकीसाठी आगामी वर्षाखेर व नववर्षागमनाच्या दृष्टीने लिकर उद्योगातील कंपन्यांच्या समभागांतील खरेदी फायदेशीर ठरू शकेल. तसेच वीज आणि पर्यायी ऊर्जेच्या क्षेत्रातील समभागही मध्यमकाळात चांगली कमाई करुन देऊ शकतात. फार्मा उद्योगात गेल्या काही महिन्यात दिसून आलेली तेजी पाहता लॉरेस लॅबचा समभाग ६०० रुपयांचे लक्ष ठेवून खरेदी करता येईल. याखेरीज जीएनएफसीचा समभाग ६६० रुपयांचे लक्ष्य आणि ६२२ रुपयांचा स्टॉपलॉस ठेवून खरेदी करता येईल.

बाजारावर परिणाम करणाऱ्या घटनांची मोठी यादी पाहता दोलायमानता आणि चढउतार या आठवड्यातही तीव्र स्वरुपाचे राहू शकतात. सबब गुंतवणूकदारांनी आपली जोखीम क्षमता लक्षात घेऊन, तर ट्रेडर्सनी स्टॉपलॉसचे टूल वापरून आपली रणनीती अवलंबावी.

◆◆◆

# धर्मावर आधारित समाज व्यवस्था लादून मतदार 'अक्कलमारीचा' प्रयोग यशस्वी

## सामाजिक आणि आर्थिक शोषण स्वातंत्र्योत्तर काळात देखील चालू; उन्नत चेतना देशातील आम लोकशाही बळकट करणार



नगर – धर्मावर आधारित समाज व्यवस्था लादून मतदार अक्कलमारीचा प्रयोग यशस्वी झाला आहे. यामुळे देशातील मोठ्या समाज घटकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय नाकारला जात असताना एकात्मिक ज्ञान सिद्धांतावर आधारित उन्नत चेतना देशातील आम लोकशाही बळकट करणार असल्याचा विश्वास पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. देशात लोकशाही उन्नत करण्यासाठी लोकशाही संरक्षण कायद्याची अत्यंत गरज असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

धर्मावर आधारित देशात बहुमत मिळवून पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी हे मनुचा सामाजिक आर्थिक न्याय नाकारणारा कायदा स्वातंत्र्याच्या ७७ वर्षात देखील राबवित आहेत. त्यामुळे आज देशाचे मोठे नुकसान होऊन विकास साधला जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

काही वर्षानंतर इयत्ता चौथीच्या इतिहासाच्या पुस्तकात भारतीय संविधान अस्तित्वात असताना देखील मोदी, शहा आणि योगी हे मनुचा सामाजिक, आर्थिक न्याय नाकारणारा कायदा भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात देखील राबवू शकले आणि त्यातूनच भारत हा आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या दुबळा राहिला. ही बाब विद्यार्थी जाहीर रीतीने वाचल्याशिवाय राहणार नसल्याचे म्हंटले आहे.

समाजाचा मोठा घटक उन्नत चेतना प्राप्तीपासून वंचित राहिला. याची प्रचिती भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात देखील सर्व भारतीय लोकांना येत आहे. भारतातील एक उद्योजक आपल्या मुलाच्या लग्नाला पाचशे कोटी रुपये खर्च करतो, तर लाडकी बहीण योजनेतून मिळालेल्या दीड हजारातून एखादे सरकार बहुमतात येते. यातून भारतातील आर्थिक विषमता किती टोकाची आहे ही बाब सिद्ध होते. तर मतदार अक्कलमारीच्या माध्यमातून लाडकी बहीण योजना राबवून आर्थिक आणि सामाजिक शोषणामध्ये गुदमरलेल्या महिलांनी सत्ताधाऱ्यांना मोठे मतदान केले. ही बाब देखील सामाजिक आणि आर्थिक शोषण स्वातंत्र्योत्तर काळात देखील चालू असल्याचे सिद्ध करत असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

कायद्याचे राज्य ही संकल्पना एकांगी आहे. कायदा करण्यासाठी उन्नत चेतना असणाऱ्या लोकांची गरज असते. त्याचवेळेला कायदा राबवण्यासाठी उन्नत चेतना असणाऱ्या लोकांची गरज असते आणि कायद्याचे न्याय अर्थ काढण्यासाठी सुद्धा उन्नत चेतनेची गरज असते. उन्नत चेतनेशिवाय कायदा अधू होतो आणि समाजव्यवस्था आणि राज्य व्यवस्था दिव्यांग बनते, असे देखील संघटनेने स्पष्ट केले आहे.

देशात १४० कोटींच्यावर लोकसंख्या असल्यामुळे देशातील लोकशाही आम लोकशाही आणि संसदीय लोकशाहीमध्ये विभागली गेली आहे. आम लोकशाही मधील मोठ्या संख्येने लोक अडाणी, अशिक्षित आणि असंघटित असल्यामुळे संसदीय लोकशाहीमध्ये सत्तापेंढारी जाण्यासाठी उत्सुक असतात. सत्तापेंढारीकडे लोकभक्ती, ज्ञानभक्ती व कर्मभक्ती नसताना देखील त्यांना सत्ता, संपत्ती आणि खोटी प्रतिष्ठा मिळवण्याचे मोठे आकर्षण असल्यामुळे मतदार अक्कलमारी नावाचा शकुनी कावा त्यांनी यशस्वी केला आहे. त्यामुळे देशात आम लोकशाही बळकट करणे आणि तमाम लोकांमध्ये उन्नत चेतना जागृत करण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी देशात लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी वकील संघटनांसह पीपल्स हेल्पलाईनने पुढाकार घेतला असल्याची भूमिका मांडण्यात आली आहे.

# नादुरुस्त निवडणूक साहित्य नाशिक येथे कंपनीकडे रवाना

## तत्पुर्वी कॉँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली पाहणी



जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघातील नादुरुस्त बॅलेट युनिट, सेंट्रल युनिट, व्हीव्हिपॅट, व सेंट्रल युनिट पॉवरपॅक इ.निवडणूक मशिनरी साहीत्य एमआयडीसी वखार महामंडळ येथुन नाशिक येथे बेल कंपनीत हलविण्यात आले. याप्रसंगी कॉँग्रेस पक्षाच्यावतीने जिल्हाध्यक्ष जयंत वाघ व बाळासाहेब भंडारी पाहणीसाठी उपस्थित होते.

नगर – जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदार संघातील नादुरुस्त बॅलेट युनीट, सेंट्रल युनिट, व्हीव्हीपॅट आणि सेंट्रल युनिट पॉवर पॅक आदी निवडणूक साहित्य सोमवारी (दि.२) सकाळी एमआयडीसीतील वखार महामंडळाच्या गोदामातून नाशिक येथील बेल कंपनीत हलविण्यात आले आहे.

निवडणूक काळात मॉक पोल आणि मतदाना वेळी नादुरुस्त झालेले बॅलेट युनिट, सेंट्रल युनिटसह सर्व साहित्य एकत्रित जमा करुन ठेवण्यात आले होते. प्रशासनाने जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघातील हे साहित्य एकत्रित करुन म तदारसंघातील हे साहित्य एकत्रित करुन ते कंपनीकडे हलविण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सर्व राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना पाचारण करण्यात आले होते. तथापी केवळ कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ आणि बाळासाहेब भंडारी हेच यावेळी उपस्थित राहिले. या नादुरुस्त साहित्यात ३४ बॅलेट युनिट, ७ सेंट्रल युनिट, ११९ व्हीव्हीपॅट आणि १६६ सेंट्रल युनिट पॉवर पॅक आदींचा समावेश होते. सदरचे साहित्य निवडणूक शाखेचे नायब तहसिलदार शंकर रोडे, अव्वल कारकून संदेश दिवटे, शिपाई महेंद्र वासाळ यांच्या माध्यमातून नाशिककडे रवाना करण्यात आले.

# नगर शहरात ४ डिसेंबरला दृष्टीहीन गायकांचा 'दिल से सारेगामापा' कार्यक्रमाचे आयोजन

## दृष्टीहीन गायकांना प्रोत्साहन व अर्थसहाय्य करण्यासाठीचा उपक्रम



नगर – दृष्टीहीन गायकांना मंच उपलब्ध करुन त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी धनश्री वेस्टर्न म्युझिक व इव्हेंट कंपनी आणि इंडियन आयडॉल फेम गायक हेमंत सिंग राठोर यांच्या संकल्पनेतून शहरात बुधवारी (दि.४ डिसेंबर) दिल से सारेगामापाचे आयोजन करण्यात आले आहे. दृष्टीहीन कलाकारांची संगीत मैफल रंगणार असून, या समाजसेवी कार्यक्रमासाठी आर्थिक सहाय्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बुधवारी नवीन टिळक रोड येथील नंदनवन लॉन्स मध्ये संध्याकाळी ६ वाजता दिल से सारेगामापा कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. या संगीत मैफलमध्ये इंडियन आयडॉल फेम गायिका अंजली गायकवाड, बॉलीवूडचे पार्श्वगायक साईराम अय्यर, अभिनेत्री व निर्माती सारा दुर्गा, मॉडेल प्रसाद बोगावत उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमासाठी प्रवेशिकाच्या माध्यमातून दृष्टीहीन गायकांना अर्थसहाय्य दिले जाणार आहे.

या कार्यक्रमास आर्थिक देणगी देऊ इच्छिणाऱ्यांनी ९११६६३६६९८, ९५६१२५३७७८ व ७४४७६४७८९७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय नाथ संमेलनात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणारे मिलिंद चवंडके हे अहिल्यानगर व लिंगायत समाजाचे भूषणच



आंतरराष्ट्रीय नाथ संमेलनात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणारे मिलिंद चवंडके यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – आंतरराष्ट्रीय पातळीवरील नाथ संमेलनात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणारे मिलिंद सदाशिव चवंडके हे अहिल्यानगरचे आणि लिंगायत गवळी समाजाचे भूषणच आहेत. पत्रकारितेचा वसा गेली अडीच तपे सांभाळताना त्यांनी नाथ संप्रदायाच्या संशोधनात आणि प्रवचनसेवेत आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटवला आहे, अशा शब्दात कौतुक करत गोविंदराव मिसाळ, राजेंद्र भागानगरे, बाळासाहेब दहिंडे, सुनिल गोडळकर यांनी पुष्पगुच्छ देऊन मिलिंद चवंडके यांना गौरविले.

मिलिंद चवंडके यांनी सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, धार्मिक, सार्वजनिक क्षेत्रात योगदान दिले. नगर जिल्हा इतिहास संशोधन मंडळाच्या कार्याध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या देखाव्यांचे सलग १८ वर्षे परिक्षक म्हणून काम पाहिले आहे. निबंध, वक्तृत्व, वादविवाद, वेशभूषा, पाककृती, रांगोळी, चित्रकला, लोककला आदी स्पर्धांचे परिक्षक म्हणून कार्य केले आहे. दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, विशेषांक, कॅलेंडर, दिपावली अंक यामध्ये मिलिंद चवंडके यांनी लिहिलेल्या कथा, कविता, प्रासंगिका, चारोळ्या, हायकू, प्रवासवर्णन, व्यक्तीचित्रण, ललित, लेखमाला, संशोधनपर लेख असे साहित्य प्रकाशित झाले आहे.

नाथ संप्रदायाच्या इतिहासात प्रथमच मिलिंद चवंडके यांनी मराठीत ओवीबध्द लिहिलेल्या ।। श्रीकानिफनाथमाहात्म्य ।। या रसाळ पोथीची प्रशंसा शंकराचार्यांसह मान्यवर मठाधिपती–पिठाधिपतींनी केली. अवघ्या २७ दिवसात या १००० पोथ्यांची विक्री झाली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या विश्व हिन्दु महासंघाच्या गोरक्षा विभागाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपद मिलिंद चवंडके भूषवित आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवारातील विविध पदांच्या जबाबदारी राष्ट्रसेवेच्या–धर्मकार्याच्या सद् भावनेने त्यांनी ४०–४२ वर्षे सांभाळत आले आहेत. नर्मदेची पायी परिक्रमा ९३ दिवसात त्यांनी पूर्ण केली आहे. धार्मिक सोहळ्यांच्या प्रसिध्दीची सेवा श्रध्देने करणारे अहिल्यानगरमधील एकमेव पत्रकार अशी ओळख स्वतःच्या निरपेक्ष कार्यामधून मिलिंद चवंडके यांनी निर्माण केली आहे. प्रवचन आणि लेखनामधून प्रभावीपणे ते धर्मजागरणाचे कार्य करत आहेत. त्यांच्या सामाजिक, सार्वजनिक आणि धार्मिक कार्याची नोंद वल्ड बुक ऑफ रेकॉर्डने घेऊन त्यांना सन्मानित केले आहे. वल्ड बुक ऑफ रेकॉर्डने गौरविलेले भारतभरातील लिंगायत गवळी समाजामधील मिलिंद चवंडके हे पहिलेच आहेत. त्यांचे एकूणच कार्य लिंगायत गवळी समाजाची आणि अहिल्यानगरची मान ऊंचावणारे ठरले आहे, असे मनोगत या कौतुक सोहळ्यात व्यक्त करण्यात आले.

# रेणावीकर विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव आणि पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात



महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या अहिल्यानगर येथील रेणावीकर माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव आणि पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला.

नगर – महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या अहिल्यानगर येथील रेणावीकर माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव आणि पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. सलग तीन दिवस सुरू असलेल्या या क्रीडा महोत्सवाची पारितोषिक वितरणाने सांगता झाली. २८ नोव्हेंबर रोजी सुरू झालेल्या या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे माजी विद्यार्थी व उद्योजक अनिरुद्ध बोपर्डीकर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मैदानावर हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन होऊन नारळ वाढवून स्पर्धेला सुरुवात झाली. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत असताना अनिरुद्ध बोपर्डीकर यांनी विद्यार्थ्यांना खेळ व व्यायाम याचबरोबर स्पर्धेतील सहभाग, जीवनातील खेळाचे महत्व आणि मूल्य याविषयी माहिती दिली.

स्पर्धा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थी क्रीडा प्रतिनिधी भावेश पवार आणि अनुजा कुलकर्णी तसेच सर्व खेळाडूंनी क्रीडा शपथ घेतली. स्पर्धेची सुरुवात सूर्यनमस्काराने झाली. याप्रसंगी सूर्यनमस्कार स्पर्धेचे परीक्षक म्हणून योग विद्या धाम येथील एडके सर व सौ. साठे मॅडम उपस्थित होत्या. तर व्हॉलीबॉल या सामन्याची सुरुवात जयंत येलुलकर यांनी नाणेफेकीने केली व खेळाडूंचा परिचय करून घेतला. सूर्यनमस्कार आणि व्हॉलीबॉल या सोबतच या क्रीडा मेळाव्यात रस्सीखेच, रिले, १०० मीटर धावणे आणि काही वैयक्तिक क्रीडा प्रकारांचाही समावेश होता.

तीन दिवसीय या क्रीडा मेळाव्याची पारितोषिक वितरणाने संपन्नता झाली. वैयक्तिक आणि सामूहिक क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवून विभाग पातळीवर खेळून आलेल्या विद्यार्थ्यांचाही बक्षीस वितरणाचा कार्यक्रम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाला. आजच्या या प्रसंगी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी व पारितोषिक वितरणासाठी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय पातळीवरील विविध खेळांचे क्रीडा मार्गदर्शक म्हणून कार्यरत असणारे सुधीर चपळगावकर तसेच शाळेचे माजी विद्यार्थी आणि वकील आणि बांधकाम व्यावसायिक संकेत बारस्कर यांना आमंत्रित करण्यात आले होते.


विविध खेळांमध्ये सहभाग नोंदवून एक उत्तम करिअर म्हणून विद्यार्थी दशेतील खेळाचा भविष्यात कसा उपयोग होतो. यावर विद्यार्थ्यांना श्री. चपळगावकर यांनी मार्गदर्शन केले. शाळेत असताना मागच्या बेंचवर बसणारा विद्यार्थी भविष्यात कशी उत्तम कारकीर्द घडवू शकतो याचे स्वतःच एक उत्तम उदाहरण आहोत असे कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे माजी विद्यार्थी संकेत बारस्कर यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. क्रीडा मेळाव्यामध्ये प्रत्येक वर्गाने आपल्या वर्गासाठी एक स्वतंत्र कलर कोड ठरवून ड्रेस कोड खरेदी केली होती.

राजेंद्र कांबळे यांनी सर्व विद्यार्थी व पालकांचे कौतुक व अभिनंदन केले आहे. यापुढेही विद्यार्थ्यांनी प्रत्येक खेळात हिरीरीने भाग घ्यावा व आपला यशस्वी सहभाग नोंदवावा याबद्दल मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे.

सूत्रसंचालन सौ. उपाध्ये यांनी केले. स्पर्धेत यशस्वी सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांचे यादी वाचन सौ. कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविक, प्रमुख पाहुण्यांचा परिचय ज्येष्ठ व क्रीडा अध्यापक भालसिंग सर यांनी केले तर आभार प्रदर्शन बोरुडे सर यांनी केले.

# 'अग्निदिव्य' पुस्तकाला स्व.राजाराम डाकवे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार

## लेखक आशिष निनगुरकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार






सातारा – कराड येथून दिला जाणारा राज्यस्तरीय स्व.राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार येथील युवालेखक आशिष अशोक निनगुरकर यांच्या अग्निदिव्य या चरित्रपुस्तकाला जाहीर झाला आहे, अशी माहिती ट्रस्टचे संस्थापक–अध्यक्ष डॉ. संदीप डाकवे यांनी दिली आहे.

पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्व.राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार स्पर्धेचे पुरस्कार जाहीर झाले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष संदीप डाकवे, उपाध्यक्ष आप्पासाहेब निवडूंगे, सचिव रेश्मा डाकवे व पदाधिकारी उपस्थित होते.

विविध विभागातील साहित्यकृतींमधून येथील हरहुन्नरी लेखक आशिष निनगुरकर यांच्या चपराक प्रकाशनाची निर्मिती असलेल्या 'अग्निदिव्य' या चरित्र पुस्तकाची निवड झाली असून या संग्रहास यंदाचा राज्यस्तरीय स्व.राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. एका संकटग्रस्त कुटुंबातील स्त्रीला संशयकल्लोळातून कोणत्या अग्निदिव्यातून जावं लागलं, हे सांगणारी ही वास्तव कथा या पुस्तकातून मांडण्यात आली आहे.

एका आईचं कर्तव्य पार पाडलं. कुठलाही दोष नसताना, गैरसमजाच्या अग्निदिव्यातून जात तिनं एक महत्त्वाचा टप्पा गाठला. यात आपलं अस्तित्व, ओळख मात्र ती पार विसरून गेली.रमाबाई कांबळे यांचा जीवनपट वाचून आपल्या जीवनातील असंख्य अडचणी आपल्याला नगण्य वाटतील व स्त्रीचा आदर करणे गरजेचे आहे हे देखील मनोमन पटते. नात्यांची ओळख सांगणारे हे आशयघन पुस्तक काळजाचा ठाव घेणारे आहे. एरवी कुणाच्या लक्षातही न येणाऱ्या सामान्य स्त्रीचे अग्निदिव्य आशिष निनगुरकर यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून प्रकाशात आणले. याच पुस्तकाची दखल स्पंदन संस्थेने घेतली असून 'चपराक प्रकाशन'ची दर्जेदार निर्मिती असलेल्या या पुस्तकाला हा साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

आशिष यांची एकूण आठ पुस्तके प्रकाशित झाली असून या पुस्तकांनी साहित्यक्षेत्रातील विविध मानाचे साहित्य पुरस्कार पटकावले आहेत. त्यातील 'अग्निदिव्य' या पुस्तकाची दखल घेण्यात आली आहे.

सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरुप असून पुरस्कारप्राप्त लेखक आशिष निनगुरकर यांना डिसेंबरमध्ये होणाऱ्या कराड येथील समारंभात कलाकारांच्या उपस्थितीत गौरवण्यात येणार असल्याची माहिती डॉ.संदीप डाकवे यांनी दिली आहे.

# वाहन पसंतीक्रमांक शुल्क ऑनलाईन भरता येणार

शिर्डी – नवीन वाहन खरेदी केल्यानंतर वाहनधारक पसंतीक्रमांक शुल्क आता ऑनलाईन भरता येणार असून या सुविधेचा लाभ वाहनधारकांनी घ्यावा, असे आवाहन श्रीरामपूर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी यांनी केले आहे.नवीन वाहन खरेदी केल्यानंतर वाहनधारक परिवहन कार्यालयात येऊन पसंती क्रमांक शुल्क भरणा करून त्यांच्या वाहनांकरिता पसंती क्रमांक घेत असतात. २६ नोव्हेंबर पासून शासनाने parivahan.gov.in या संकेतस्थळावर पसंती क्रमांक शुल्क ऑनलाईन भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असल्याचेही उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे कळविण्यात आले आहे.



अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सचिन वाघस्कर यांनी निंबोडी येथील चक१६ हुरडा पार्टी या ठिकाणी हुरडा पार्टीचे आयोजन केले होते. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खेळ खेळत, बैलगाडी सफर, नेमबाजी व बोटिंग करत संपूर्ण दिवस मोठ्या आनंदात घालविला. विद्यार्थ्यांसाठी हा एक नवा अनुभव होता. यावेळी विद्यार्थ्यांनी चहा, नाश्ता, गरमागरम हुरडा व सुग्रास जेवणाचा आस्वाद घेतला. विद्यार्थ्यांनी जेवणाचा आस्वाद घेतला. या हुरडा पार्टीसाठी किसन पोटे, अनामप्रेम परिवारातील विष्णू वारकरी, राहुल खिरोडे, अक्षय राऊत, कु. सुरेखा राठोड, कु. कल्पना कदम, कु. पूनम जाधव यांनी परिश्रम घेतले.

# भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेट गैरव्यवहारप्रकरणी फरार आरोपीस पोलिसांनी केले जेरबंद



भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेट गैरव्यवहारप्रकरणी फरार आरोपी अटक केल्यानंतर त्याच्यासमवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेडमध्ये गैरव्यहार प्रकरणी फरार असलेल्या मुख्य आरोपीस एमआयडीसी पोलिसांनी सापळा लावून पंढरपूर येथे जेरबंद केले आहे.

याबाबतची माहिती अशी की, १० सप्टेंबर रोजी रोजी फिर्यादी रोहीदास सदाशिव जाधव (वय ७४, धंदा शेती, रा. जेऊर, ता. जि. अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनला फिर्याद होती. ४/८/२०२२ ते २६/८/२०२४ रोजी दरम्यान वेळोवेळी मुख्य आरोपी भारत बबन पुंड (रा. बेलपिंपळगाव, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर) व त्याचे साथीदार यांनी कट कारस्थान रचून फिर्यादी व ३५० पेक्षा जास्त ठेवीदारांचा विश्वास संपादन करुन त्यांचे मल्टीस्टेट सोसायटीमध्ये चालू व बचत खाते उघडून त्यात रोख रकमा जमा करुन जास्त व्याजदर देतो, रकमा दामदुप्पट देतो, असे आमीष दाखवून ठेवीदारांच्या रोख रकमाच्या ठेवी घेवून डेली कलेक्शनद्वारे रोख रकमा जमा करुन घेतल्या. त्यानंतर ठेवीदारांनी त्यांच्या पैशाची मागणी केली असता आरोपी भारत पुंड व इतर सहकाऱ्यांनी २१ कोटी रुपयापेक्षा जास्त ठेवी लाभासह परतफेड न करता त्यांनी कपटपूर्व रितीने कसूर करुन त्यांचा विश्वासघात करुन आर्थिक फसवणूक करत सोसायटीची जेऊर येथील शाखा बंद करुन फसवणूक केली. या फिर्यादीवरुन एमआयडीसीपोस्टे गुन्हा रजि. नंबर ६६७/२०२४ B.N.S. २०२३ चे कलम ३१६ (५), ३१८ (३), ३१८(४), ६१ (२) सह MPID कायदा कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचा तपास करत असतांना सपोनि माणिक चौधरी यांना गोपनिय व तांत्रिक विश्लेषणाचे अधारे माहिती मिळाली की, सदर गुन्हयातील मुख्य आरोपी भारत पुंड हा पंढरपुर या ठिकाणी लपून बसला आहे. त्यावरुन एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पथकाने पंढरपुर येथे जावून आरोपीस सापळा लावून ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हयात २ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली असून, पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक माणिक चौधरी हे करीत आहेत.

ही कामगिरी सपोनि. माणिक बी. चौधरी, पोसई जाधव, पोहेकॉ. नितीन उगलमुगले, पोहेकॉ. सुद्रीक, पोकॉ. किशोर जाधव, पोकॉ. सुरज देशमुख, पोकॉ. राहुल गुंड यांच्या पथकाने केली आहे.

